www.dainikmahabharat.com · RNI No. MAHMAR/2015/64418 · jaymahabharat2015@gmail.com



## कोकण विभागातील खारभूमी योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत


# दैनिक महाभारत

संपादक – विजयकुमार वाव्हळ


मुंबई / बी.डी.गायकवाड
कोकण विभागात भरती-ओहोटी व चक्रीवादळांमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, विविध योजनांच्या लाभक्षेत्रातील पिकाखालील क्षेत्र नापिक होणे, गोड्या पाण्याचे स्त्रोत भरतीच्या पाण्यामुळे क्षारयुक्त होणे, तसेच लाभक्षेत्रातील गावांना भरती व पुराचा धोका निर्माण होणे आदी समस्या उद्भवत आहेत. त्यामुळे बृहत आराखड्यातील नवीन योजनांची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिले.


महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) • दैनिक • मराठी • वर्ष – १० • अंक २९७ • बुधवार दि.१८ जुन २०२५ • किंमत २ रू. • पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक


भाजपा ने केन्द्र में अपने ११ वर्षों के कार्यकाल के बारे में जो अपार उपलब्धियाँ वर्णित की हैं वे जमीनी हकीकत में लोगों की गरीबी, बेरोजगारी, दुख-दर्द आदि दूर करने अर्थात जन व देशहित में कितनी लोभदायक रही है, सही समय आने पर जनता खुद उनका जवाब दे देगी, जिसकी पूरी उम्मीद।
मायावती



विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, बॉम्बस्फोटातील आरोपी सलीम कुत्ता सोबत पार्टी करत असताना बडगुजर यांच्या संवेदना मेल्या आहेत का? याचवेळी एसआयटी मार्फत टाइम-बाउंड चौकशी करण्याची देखील ग्वाही दिली होती.
नाना पटोले



आज केंद्र सरकारने येत्या काळात होणाऱ्या जनगणने संदर्भात एक अधिसूचना जाहीर केली. मात्र, ही अधिसूचना जाहीर करताना; त्यांनी कुठेही त्यात जातीनिहाय जनगणना होईल, असे नमूद केलेले नाही.
यशोमती ठाकूर



कोणताही व्यक्ती असो तो जातीने नाही तर विचाराने आंबेडकरवादी असला पाहिजे,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सही असणारी टाय घालणारा आपला मेहनती ख.झ.ड बिरदेव डोणे.! है जय भीम तो बोलो जय भीम.जय.जय.जय.जय भीमजितेंद्र आव्हाड



# युद्धाचा सहावा दिवस, इराणचा इस्त्रायलवर हायपरसोनिक मिसाईलने हल्ला



नवी दिल्ली: इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष सहाव्या दिवशीही सुरू आहे. दोन्ही बाजूने भीषण बॉम्ब हल्ला करण्यात आला. इस्त्रायलच्या सुरक्षा रक्षकांनी इराणच्या रिफायनरीज आणि सैन्य कमांडवर हल्ला करत ते उद्धस्त केले. तर इराणने रिव्हॉल्युशनरी गार्ड्सने दावा केला की बुधवारी इराणच्या सैन्याने इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्यात हायपरसोनिक ऋरींह-१ मिसाईलचा वापर केला.

इराणच्या मते फत्ताह मिसाईल हे हायपरसोनिक मिसाईल आहे जे मॅक ५ अथवा ध्वनीच्या गतीने पाच पटीने म्हणजेच साधारण ३८०० मील प्रति तासाच्या वेगाने हल्ला करते.

याआधी आंतरराष्ट्रीय ॲटोमिक एनर्जी एजन्सीने हा दावा केला की इराणच्या एका अणुकेंद्राला लक्ष्य बनवण्यात आले होते. राष्ट्रपती ट्रम्प यांचा दावा आहे की अमेरिकेचा इराणच्या एअरस्पेसवर संपूर्ण ताबा आहे. इराणचे म्हणणे आहे की त्यांनी तेल अवीवमध्ये एका गुप्त केंद्राला लक्ष्य बनवले आहे. तर इस्त्रायलने नागरिक आणि सैन्य ठिकाणांवर हल्ला केल्याला दुजोरा दिला आहे.


## इस्त्रायलच्या मोसाद मुख्यालयावर इराणचा हल्ला, पत्त्यासारखी कोसळली इमारत



तेल अविव: इस्रायल आणि इराणमधील संघर्ष ( पाचव्या दिवशीही सुरू आहे. किंबहुना हा संघर्ष आता विकोपाला पोहोचला असल्याचे पाहायला मिळत आहे. दोन्हीही देश एकमेकांच्या जिवावर उठले असल्यासारखा हल्ल्यांवर हल्ले करत आहे. या संबंधित आणखीन एक मोठी माहिती समोर आली आहे. ज्यामध्ये इराणने इस्रायलच्या मोसाद मुख्यालयावर बेलिस्टिक क्षेपणास्त्र डागले. इस्रायलची राजधानी तेल अव्हीवमध्ये मोसादचे हे मुख्य कार्यालय आहे. याच कार्यालयावर हा हल्ला करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. हल्ल्याचा व्हिडिओ देखील समोर आला आहे.

मंगळवारी, इराणने तेल अवीव येथील इस्रायलच्या गुप्तचर संस्थेच्या मोसादच्या मुख्यालयावर हवाई हल्ला केला आहे. याशिवाय लष्करी गुप्तचर संस्थेशी संबंधित अमान या गुप्तचर संस्थेच्या इमारतीलाही लक्ष्य करण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे.

# देशभरात मान्सून सक्रिय; केरळ, तामिळनाडूच्या अनेक जिल्ह्यांमध्ये शाळा बंद



हैदराबाद : भारतीय हवामान विभागानं सोमवारी (१६ जून) कर्नाटक, केरळ आणि गोव्यासह महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट जारी केला आहे. या भागात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्यानं सखल भागात पाणी साचण्याची शक्यताही वर्तवली आहे. लोकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

महाराष्ट्रात रायगडला रेड तर मुंबई जिल्ह्याला यलो अलर्ट- राज्यभरात पाऊस सक्रिय झाला आहे. सोमवारपर्यंत विदर्भाच्या काही भागांत मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोकणामध्ये रत्नागिरी, डहाणू येथे मुसळधार पाऊस नोंदवला गेला आहे. तर मुंबईमध्येही दिवसभरात तुरळक ठिकाणी पावसाचा जोर वाढलेला दिसला. मुंबईला यलो अलर्ट तर रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यातही काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला.

केरळात मुसळधार पाऊस, अनेक जिल्ह्यांमध्ये शाळा बंद- केरळमध्ये रविवारपासून सतत पाऊस पडत आहे. आयएमडीनं १८ जूनपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट आणि ६ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. सोमवारी त्रिशूर, कन्नूर, वायनाड, कोझिकोड, इडुक्की, एर्नाकुलम, मलप्पुरमसह ११ जिल्ह्यांमधील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. अलाप्पुझा जिल्ह्यातील कुट्टनाड तालुक्यातही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच, केरळ आणि माहे किनारपट्टीच्या भागात ३.४ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता असल्याने, १८ जूनपर्यंत मच्छिमारांना समुद्रात जाऊ नये असा इशारा देण्यात आला आहे.

तामिळनाडूतील नीलगिरी जिल्ह्यातही शाळा बंद - तामिळनाडूच्या नीलगिरी जिल्ह्यात मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यांमुळे, सोमवारी ऊटी (उधगमंडलम), कुंडा, गुडालूर आणि पंडालूर तालुक्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने लोकांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचं आवाहन केलं आहे.

दिल्लीत पावसामुळे उष्णतेपासून दिलासा - रविवारी सकाळी दिल्लीत हलक्या ते मध्यम पावसाची नोंद झाली. यामुळे कडक उन्हापासून दिलासा मिळाला. हवामान खात्याने राजधानीच्या काही भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, ज्यामध्ये ५०-६० किमी/ताशी वेगाने वारे वाहतील. वादळासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. सफदरजंग, लोधी रोड आणि पुसा भागात २७ ते ३३.५ मिमी पावसाची नोंद झाली. पावसानंतर, हवेचा दर्जा निर्देशांक ६२ पर्यंत सुधारला, जो समाधानकारक श्रेणीत येतो. सोमवारी किमान तापमान २३ अंश सेल्सिअस

## पहिली ते पाचवीच्या मराठी अन् इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठी

## हिंदी असेल तृतीय भाषामागे



मुंबई: राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल. शिवाय अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता ६वी ते १०वी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण प्रमाणे असेल. असा भाषाविषयक धोरण या शीर्षकाखालील उपपरिच्छेदामध्ये नमूद करण्यात आले असून शासनाने हा निर्णय जारी केला आहे.

इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय अखेर मागे

राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासूनच त्रिभाषा सूत्र स्वीकारले असून मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये तिसरी भाषा ही हिंदी अनिवार्य, असा शासन निर्णय केला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसोबतच राज्य अभ्यासक्रम आराखडा नव्या शैक्षणिक वर्षापासून लागू करताना मराठी शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर पालकांनी, राजकीय नेत्यांनी आणि शिक्षक संघटनांनी त्याला तीव्र विरोध केला होता. याविरोधानंतर सरकारने बाजू मांडत शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय अखेर मागे घेत असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केली होती. आता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून नवा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

## भाजपसोबत युती करणार नाही; शरद पवारांकडून युतीच्या चर्चांना ब्रेक:तर प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार म्हणत अजित पवारांची प्रतिक्रिया

मुंबई / वृत्तसंस्था

गेल्या काही दिवसांपासून शरद पवार आणि अजित पवार हे एकत्र येणार असल्याची चर्चा राज्यात सुरू आहे. त्यामुळे शरद पवार आता भारतीय जनता पक्षासोबत महायुतीमध्ये सामील होणार का? याबाबत तर्क-वितर्क लावले जात होते. मात्र या सर्व चर्चांना शरद पवार यांनी ब्रेक लावला आहे. संधिसाधूपणा करणाऱ्यांना सोबत घेणार नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. कोणासोबतही युती करा, मात्र भारतीय जनता पक्षासोबत नाही, असा थेट इशाराच शरद पवार यांनी दिला आहे.

या संदर्भात शद पवार यांच्या वक्तव्यामुळे गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना ब्रेक लागला आहे. वास्तविक हा निर्णय सुप्रिया सुळे घेणार असल्याचे शरद पवार यांनी याआधी सांगितले होते. मात्र, सुळे यांनी अशा युतीला स्पष्ट शब्दात नकार दिला होता. आता थेट शरद पवार यांनी देखील भाजपवर निशाणा साधला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेला ब्रेक लागला आहे.

या संबंधी बोलताना शरद पवार म्हणाले की, गांधी, नेहरू, चव्हाण यांचे विचार, फुले,



शाहू, आंबेडकर यांचे विचार जर सर्व म्हणत असतील तर ते मला मंजूर आहे. पण सत्तेसाठी भाजपसोबत जाऊन बरोबर बसायचे, ही भूमिका कोणी मांडत असेल तर हा विचार काँग्रेसचा विचार नाही. त्यामुळे कोणाशीही संबंध ठेवा मात्र भाजपशी संबंध हा काँग्रेसचा विचार असू शकत नाही. त्यामुळे अशा पद्धतीने संधिसाधूपणाचे राजकारण हे आपल्याला करायचे नाही. अशा स्पष्ट शब्दात शरद पवार यांनी आपली भूमिका मांडली आहे.

या बाबत शरद पवारांनी मोठे विधान केले आहे. 'कुणाशीही संबंध ठेवा, पण भाजपशी संबंध ठेवू नका, संधिसाधूपणाचे राजकारण करु नका, सत्तेसाठी भाजप बरोबर जाणाऱ्यांची साथ नको, अशी स्पष्ट भूमिका शरद पवारांनी मांडली आहे.

प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार - अजित पवार

शरद पवार हे अजित पवार यांच्यासोबत महायुतीमध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होत्या. यामुळे अजित पवार यांच्या पक्षातील अनेक नेते मंडळींचा आनंद द्विगुणीत झाला होता. मात्र आता शरद पवार यांनी थेट भाजपसोबत जाणार नसल्याची भूमिका व्यक्त केली आहे.

# यंदाही वारकऱ्यांना टोल फ्री

## मात्र त्यासाठी नेमकं काय करावं लागणार? जाणून घ्या

प्रतिनिधी । पंढरपुर

राज्यातील घडामोडींना वेग आला असून आता वारकऱ्यांसाठी राज्य सरकाने एक महत्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. पंढरपूरमार्गी जाणाऱ्या मानाच्या पालख्यांना आणि वारकऱ्यांना टोलमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. १८ जून ते १० जुलै दरम्यान वारकऱ्यांना ही टोलमाफी दिली जाणार आहे.

१० मानाच्या पालख्या जाणाऱ्या मार्गांवर टोलमाफीचा निर्णय

पंढरपूर वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांना टोल माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. शासनाच्या निर्णयानुसार टोल नाक्यावर वारकरी, मानाच्या पालख्या आणि आणि भाविकांना टोलमाफी मिळणार आहे. याचा फायदा जड आणि हलक्या वाहनांना होणार आहे. त्यासाठी गाडी क्रमांक, चालकाचे नाव नोंद करून त्याचे स्टिकर्स परिवहन विभाग, पोलिस किंवा आरटीओ यांच्याकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पण हा लाभ मिळवण्यासाठी टोलमाफीचे स्टीकर्स कसे



मिळवायचे? आणि त्यासाठी नेमकं काय करावं लागणार आहे यासंबंधी शासनाने परिपत्रक जारी केलं आहे.

आगामी सन २०२५ च्या आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या तसेच भाविकांच्या व वारकऱ्यांसाठीच्या सोयी-सुविधा, त्यांचे वाहनांना पथकरातून सूट देणे, तसेच वारी मार्गावरील रस्ते दुरुस्ती या विषयाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दि. २८ मे, २०२५ रोजी बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा होऊन मा. मुख्यमंत्री महोदयांनी विविध विभागांना त्या अनुषंगाने सुचना व निर्देश दिले आहेत, त्यास अनुसरुन सर्व संबंधितांना या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे:-

# महामार्गावर वाहन चालवताना कशी घ्यावी काळजी

## सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्या झिरपे यांनी केले मार्गदर्शन

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत अपर पोलीस महासंचालक साहेब (वाहतूक) महाराष्ट्र राज्य मुंबई,पोलीस अधिक्षक महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजी नगर पोलीस उप अधिक्षक प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विद्या झिरपे व पोलीस उपनिरीक्षक श्री.लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत प्रबोधन व जनजागृती कार्यक्रम घेत सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी वाहतुक नियमांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. वाहन चालवितांना मोबाईल फोनचा वापर टाळावा, गाडीचे कागदपत्रे नेहमी सोबत ठेवावी, ट्रिपल सिट प्रवास करु नये, दारू पिऊन वाहन चालवू नये, मोटरसायकल चालवताना नेहमी हेल्मेटचा वापर करावा,वाहन चालवताना नेहमी वेगमर्यादा चे पालन करावे, नेहमी ओव्हरटेक करतांना उजव्या बाजूने करावे,विरुद्ध दिशेने वाहन चालवू नये,वाहन चालवताना वाहतूक चिन्हे पाहून त्या सूचना प्रमाणे वाहन चालवावे,चारचाकी वाहन चालवताना चालक तसेच सर्वच प्रवाशांनी सीटबेल्ट वापरावे, मोटर सायकल चालवताना नेहमी सर्व्हिस रोड चा वापर करावा ज्या ठिकाणी सर्व्हिस रोड नसेल त्याठिकाणी शोल्डर लेन चा वापर करावा,रस्त्यांवर धोकादायक परिस्थितीत कोणतेही वाहन थांबवू नये, वाहन चालवताना समोरील वाहनाच्या वेगाचा अंदाज घेऊन वाहन चालवावे कारण समोरील वाहनाच्या वेगाचा अंदाज न आल्याने पाठीमागील वाहनाने समोरील वाहनास धडक दिल्याने घडणाऱ्या अपघातांच्या प्रमाणामध्ये वाढ झाली आहे, अपघात झाल्यास डायल ११२ शि तात्काळ संपर्क साधावा, शाळेतील विद्यार्थीनी यांना बॅड टच / गुड टच या बाबत योग्य मार्गदर्शन केले याबाबत मार्गदर्शन करुन मृत्युंजय दूत संकल्पनेची सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक, सहाय्यक फौजदार रमेश धस, हेड कॉन्स्टेबल भीमलाल राठोड, विनोद तांगडे, शांताराम सोनवणे,





# सहयोग मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अकोले शाखेच्या उद्घाटन सोहळ्याचा भव्य आयोजन

अकोले / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

सहकार क्षेत्रात समाजाभिमुख सेवा देणाऱ्या सहयोग मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेच्या अकोले येथील नवीन शाखेचा उद्घाटन सोहळा सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. दिपक महाराज देशमुख (विश्वस्त, अगस्ती महाराज देवस्थान, ट्रस्ट) यांच्या पवित्र हस्ते संपन्न झाले. महाराजांनी या वेळी दिलेल्या आशीर्वादमय शुभेच्छा मनाला स्फूर्ती देणाऱ्या ठरल्या.समाजाच्या आर्थिक प्रगतीसाठी सहकार हीच खरी ताकद असून, सहकार्य, विश्वास आणि पारदर्शकता या त्रिसूत्रीवर सहकार संस्था उभी राहिल्यास गावचा सर्वांगीण विकास साध्य होतो, अशा शब्दांत त्यांनी उपस्थितांना प्रेरणा दिली.

प्रमुख उपस्थितीत ह.भ.प. रमेश महाराज भोरे (धामणगाव पाट) आणि ह.भ.प. चंद्रकांत महाराज चौधरी (सरस्वती विद्यालय, अकोले) यांची वंदनीय उपस्थिती लाभली.कार्यक्रमास स्थानिक शेतकरी बंधू, व्यापारी, शिक्षक, व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याने एक सामाजिक एकात्मता आणि आर्थिक प्रबोधन यांचे दर्शन घडवले. दिगंबर सुखदेव टेकाळे (चेअरमन, सहयोग मल्टीस्टेट) आणि त्यांच्या सहकारी संचालक मंडळाने उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानून, या संस्थेच्या माध्यमातून गावोगावी आर्थिक सेवा आणि विकास पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# जायंट्स फेडरेशनची द्वितीय कौंसिल व वृक्षारोपण संपन्न

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

वेरूळ जैन गुरुकुल येथे जायंट्स फेडरेशन २ ब ची द्वितीय कौन्सिल संपन्न झाली. या कौन्सिल मिटिंग मध्ये फेडरेशन ऑफिसर श्री दिनेश सावजी यांनी जायंट्सच्या कार्याची सर्वत्र प्रचार व प्रसार करण्यासाठी वर्तमान पत्र समूहा पर्यत जाण्याचे प्रभावी माध्यम आहे हे प्रतिपादन केले. या प्रसंगी डेप्युटी वर्ल्ड चेअरमन श्री विजयकुमार चौधरी, स्पेशल समिति सदस्य श्री विनोद शेवतेकर, जगन्नाथ साळुंके,सूर्यमाला मालानी,संजय गुगळे यांनी सखोल आढावा घेऊन सर्व फेडरेशन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. फेडरेशन समन्वयक श्री नरेंद्र पारख यांनी जायंट्स गोल्डन जुबली कन्वेशन मध्ये सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले तसेच फेडरेशन कोषाध्यक्ष श्री सुमित गुप्ता,अध्यक्ष डॉ गुरूदत्त राजपूत,सचिव रंजना भावसार, उपाध्यक्ष श्री रत्नाकर महाजन, फेडरेशन ऑफिसर श्री दिनेश गंगवाल यांनी कार्य अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ रंजना भावसार यांनी तर आभारप्रदर्शन विशाखा रगडे




# छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्षपदी आमदार सतीश चव्हाण

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण यांची नियुक्ती केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी मंगळवारी (दि.१७) मुंबईत नियुक्त पत्र दिले. याप्रसंगी आ.शिवाजीराव गर्जे, आ.प्रताप पाटील चिखलीकर, मा.आ.कैलास पाटील, मा.आ.ओमप्रकाश पोकर्णा, श्रीमती मिनलताई खतगावकर आदींची उपस्थिती होती.

खरं तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी हा सर्वसामान्यांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. या पक्षात कधीच जात, पात, धर्म, राजकीय पार्श्वभूमी असे काहीही न पाहता पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणार्या कार्यकर्त्याला संधी दिली जाते. आमदार सतीश चव्हाण हे तीन वेळा मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार झालेले आहेत.आणि आता त्यांना छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष होण्याची संधी देण्यात आली आहे. याबद्दल अजितदादा पवार, खा.सुनील तटकरे यांचे त्यांनी मनापासून आभार मानले .छत्रपती संभाजीनगर जिल्हा नेहमीच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या विचारांशी जोडलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यातील सामान्य नागरिकांपर्यंत पक्षाचा विचार पोहचून जिल्ह्यातील पक्ष संघटन प्रभावी व लोकहिताचे काम करण्यावर आपला भर राहील. गावपातळी ते तालुका अशी पक्षाची नव्याने पुनर्बांधणी करण्यात येईल. पक्षाचे सर्व सेल कार्यान्वित करून युवक, महिला व मुख्य जिल्हा कमिटीची नव्याने रचना करण्यात येईल. येणार्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी एक नंबरचा पक्ष व्हावा यादृष्टीने पक्षविस्तारासाठी आपण लक्ष देणार असून स्थानिक पातळीवरील युवा नेतृत्वाला पक्षामध्ये काम करण्याची अधिकाधिक संधी दिली जाईल. महिला नेतृत्वाला प्राधान्य देण्याबरोबरच अर्थकारणामध्ये तिचे हात बळकट केले जातील. शेतकर्यांच्या समस्या सोडविण्याबरोबरच त्यांना शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन कसे मिळेल यासाठी प्रयत्न करणार आहोत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची ताकद निश्चितच वाढलेली दिसेल असा विश्वास नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष आमदार सतीश चव्हाण यांनी व्यक्त केला.या निवडीचे समर्थक व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी स्वागत करत अभिनंदन केले आहे.



# ठेवीदारांना चुना लावून फरार झालेल्या बाहेती दाम्पत्यास नांदेड पोलिसांकडून अटक

## ठेवीदार कृती समितीने नांदेडचे पोलीस अधीक्षक व तपास अधिकारी यांचे मानले आभार



परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

मागील दोन वर्षा पासून सतत खेटे मारत आरोपींचे सर्व डिटेल्स देऊण देखील बीडच्या पोलीस प्रशासनास राजस्थानी मल्टिस्टेट चा एकाही फरार आरोपीस अटक केले नाही.परंतु जिल्ह्यात सर्वात कमी ठेवी असुण देखील नांदेड पोलीसांनी एकाच भेटीमध्ये घटणेचे गांभिर्य पाहता आणि ठेवीदारांची व्यथा पाहुण सर्वोत्तम कामगिरी केली आहे.पोलीस अधिक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशावरुन आर्थिक गुन्हे शाखेचे कर्तव्यदक्ष पोलीस निरक्षक श्री एन. बी. कुंडगीर साहेब यांनी इचलकरंजी येथुन आर्थिक गुन्हे शाखेची टिम सोबत घेऊन रातोरात राजस्थानी मल्टिस्टेट व पोदार स्कुल चा सचिव आणि या प्रकराणातील प्रमुख आरोपी असलेल्या बद्रिनारायण बाहेती व प्रेमलता बाहेतीस यांना अटक करुण नांदेड येथील जिल्हा न्यायालयात हजर केले असता त्यांना आठ दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

या सर्वोत्कृष्ट कामगिरी बद्दल ठेवीदार कृती समितीचे अध्यक्ष सेवकराम जाधव सर यांच्या नेतृत्वात कृती समितीच्या शिष्टमंडळाने नांदेड येथील पोलीस अधिक्षक कार्यालयात जाऊण एसपी अविनाश कुमार यांची भेट घेत त्यांचे व श्रि कुंडगीर साहेबांचे आभार व्यक्त केले.यावेळी वेगवान मराठी चे उपसंपादक पत्रकार केशव मुंडे, बाबासाहेब पांचांगे सर, मिलिंद क्षिरसागर,परमेश्वर दहिफळे,सुधीर देशमुख साहेब,नारायण लाल झंवर सेठ ,नंदकिशोर साबु हे ठेवीदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.दरम्यान माननीय एसपी साहेबांनी स्थानीक नागरीकांना थांबवुण परळीहुण आलेल्या बीड जिल्ह्यातील ठेवीदारांना आगोदर भेटीसाठी बोलावुण घेत आस्थेवाईकपणे संपुर्ण व्यथा ऐकुण घेतली आणि कायद्याच्या चौकटीत जे जे शक्य असेल ते करण्याचे सांगत आरोपींवर योग्य ती कारवाई

# ईगल ९३०५ सोयाबीन बियाणे उगवले नाही; शेतकरी तिमापुरे यांची प्रशासनाकडे तक्रार

अंगद सुरोशे ।हिमायतनगर

हिमायतनगर येथील शेतकरी बालाजी तिमापुरे यांना त्यांच्या शेतात पेरलेल्या सोयाबीनच्या बियाण्यामुळे मोठ्या आर्थिक फटक्याचा सामना करावा लागत आहे. त्यांनी पळशीकर ट्रेडिंग कंपनी येथून ईगल ९३०५ या कंपनीचे १८ बॅग सोयाबीन बियाणे खरेदी करून जून महिन्याच्या सुरुवातीस पेरणी केली होती. समाधानकारक पावसामुळे पेरणी योग्य वेळी झाली.

असे असतानाही आजपर्यंत शेतात सोयाबीन उगवलेच नाही, असा गंभीर आरोप तिमापुरे यांनी केला आहे.या संदर्भात त्यांनी हिमायतनगर तहसिलदार, कृषि अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदन दिले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या शेतात भेट देऊन बियाणे उगवले नाही याची चौकशी करावी आणि न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनात त्यांनी बियाणे खरेदीची पावती क्र. १८५ देखील नमूद केली आहे.या प्रकरणामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गामध्ये चिंता व्यक्त होत असून, निकृष्ट बियाणेमुळे होणारे नुकसान थांबवण्यासाठी प्रशासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळावा, अशी मागणी आता ग्रामस्थ आणि शेतकरी संघटनांकडूनही होऊ लागली आहे.

# नातव हे आजोबाच्या जीवनातील पहिले व शेवटचे मित्र असतात -बळीराम ऊबाळे



गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)


आज कालच्या धावपळीच्या जीवनात व मोबाईल च्या कालचक्रात मुलांना आई वडील यांना भेटायला वेळ मिळत नाही. मित्रहो मुले , सुना सर्व नातेवाईक हे मोबाईल मध्ये दंग झाले आहेत. लहान मुल जर रडत असेल तर सूनबाई सांगतात त्याला मोबाईल द्या मग तो रडन थांबवले. मित्रहो मोबाईलचे जेवढे फायदे आहेत तेवढे नुकसान ही जास्त आहेत. ५-६ मित्र एकत्र आले तर ते सारखे मोबाईलच पाहतात व त्यांच्यात वैचारिक घेवाण देवाण होत नाही. मोबाईल मुळे नाते संबंध संपुष्टात आले आहे.मोबाईलमुळे म्हातारे , तरुण सर्व वेड्या सारख वागत आहेत . पहिले पाहुणे घरी आले तर चहा-पाणी जेवण करीत ३-४ दिवस घरी मुक्कामाला राहत होते. एका मेकाशी खुशाली विचारत होते. भावनिक होऊन मन मोकळे करत होते . परंतु आता माणसे एका मेकाशी बोलणे महाग झाले आहे तसेच आई-बाप , मुलगा- मुलगी या सर्वांची जागा आता मोबाईलने हिसकावून घेतली आहे तसेच सध्या फक्त आजोबाजवळ त्यांची खुशाली विचारण्यासाठी कसे आहात दादा, अण्णा, भाऊ, तात्या ईत्यादी शब्द वापरून आजारी आहात का ईत्यादी प्रकारची काळजी चे प्रश्न नातवच त्याला विचारतात. पहिल्या काळात ही व आजच्या कलियुगात ही आजोबा हे नातवाचे पहिले मित्र होते व आज ही नातव हे आजोबांचे शेवट चे मित्र आहेत. असे या मध्ये कुठलाही बदल झालेला नाही. नातव व आजोबाच्या प्रेमात मोबाईल नि आज पर्यंत कुठलाही अडथळा निर्माण केलेला नाही. त्यामुळे मित्रहो मोबाईल चा वापर कमी करा, आयुष्य वाढवा , आई वडीलांना जपावे अशे आव्हान बळीराम उबाळे यांनी केले आहे...!

## बेधडक

### मान्सूनचा लपंडाव...!

आगमन तर केले मान्सूनने
पण सर्वत्र सक्रिय दिसत नाही,
लपंडाव खेळण्याची जणूकाही
सवय तो विसरत नाही..!

त्याच्या असमतोलपणाने
चिंतेत भर पडत आहे,
बरसावे त्याने सर्वत्र मनसोक्तपणे
प्रत्येकजण वाट पाहत आहे..!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com
* टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्यावतीने ब्रह्मपुरी नाभिक समाजाची कार्यकरिणी गठीत

प्रतिनिधि/ ब्रह्मपुरी
(दै.महाभारत)

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नाभिक समाजाचे एकत्रीकरण दिसावे म्हणून, आज प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी महाराष्ट्र नाभिक महामंडळातर्फे जिल्हा व तालुका कार्यकारणी शासकीय विश्रामगृह येथे गठीत करण्यात आली.ब्रम्हपुरी येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळातील वरिष्ठ शिष्टमंडळींमार्फत नाभिक समाजाची एक विशेष बैठक घेण्यात आली. ह्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्री.विनायकजी शेंडे सर, तर विशेष मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.अशोकजी सालोटकर सर (पूर्व विदर्भ अध्यक्ष), श्री.घनश्याम सूर्यवंशी (पूर्व विदर्भ संघटनमंत्री) आदी मान्यवर उपस्थित होते .विदर्भाच्या पातळीवर समाजाच्या हितासाठी निःस्वार्थपणे कार्य करणारे ब्रम्हपुरी येथील सेवानिवृत्त शिक्षक श्री.प्रदीप मेश्राम सर, यांची पूर्व विदर्भ संघटन सचिव, ह्या पदावर विशेष निवड करून त्यांना नियुक्तीपत्र व पुष्पगुच्छ देत, त्यांचा सत्कार करण्यात आली .ब्रह्मपुरीतालुक्यात नाभिक समाजासाठी स्वे:छिक व निःस्वार्थ मनाने समाजहिताचे कार्य करणाऱ्या महिला व पुरुषांची तालुका कार्यकारणी गठीत करण्यात आली. ह्यात नवनियुक्त तालुका अध्यक्ष म्हणून श्री.उदयकुमार पगाडे, श्री.आनंद दाणे (उपाध्यक्ष), श्री.विलास दाणे (सचिव) श्री.श्रावण येळने (कोषाध्यक्ष), श्री.धनंजय पगाडे (सहसचिव)... आणि तालुका संघटक म्हणून विलासजी सूर्यवंशी, मयुर मेश्राम, आनंदराव सूर्यवंशी, प्रकाश पगाडे, संजय पगाडे, होमराज पगाडे, राजेश खळसिंगे, विशाल कुंडले,सुभाष दाणे यांची निवड करण्यात आली..तसेच नवनियुक्त महिला तालुका अध्यक्षा म्हणून सौ.रश्मीताई पगाडे, सौ.सुरेखाताई लांजेवार (उपाध्यक्षा),



सौ.ज्योती दाणे (सचिव), सौ.किरण सूर्यवंशी (सहसचिव), सौ.मीना सूर्यवंशी (कोषाध्यक्षा)...आणि तालुका संघटिका म्हणून सौ.राधिका लांजेवार, सौ.दिपाली मेश्राम, सौ.संगीता सूर्यवंशी, सौ.शुभांगी शेंडे, सौ.शुभांगी मेश्राम, सौ.अर्चना फुलबांधे, सौ.रजनी सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली...ह्या सर्वांना महाराष्ट्र नाभिक महामंडळातर्फे नियुक्तीपत्र, पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते शुभेच्छ्या देत सर्वांचा जाहीर सत्कार करण्यात आला..तसेच, ह्याच विशेष बैठकीच्या वेळीस, इयता १०वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या ब्रम्हपुरी तालुक्यातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये चि.हर्षल होमराज पगाडे ९४.२०, चि.कृनाल प्रदीप सूर्यवंशी (८९.८०, कु.आर्या गजानन सूर्यवंशी ७२.४०ह्या ३ विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# अंधेर नगरी चौपट राजा शांतीवन स्मशानभूमीत अंधाराचे साम्राज्य

## परळी नगरपालिकेचा कारभार म्हणजे दिव्याखाली अंधार

परळी / विकास वाघमारे
( दै. महाभारत )

शांतीवन समशानभूमीत विजेचे खांब असून नसल्यासारखे, दि. १६ जून २५ रोजी त्याचाही प्रत्यय एका अंत्यविधी समई दिसून आला. विकासाच्या गप्पा मारणारे व विकास काम करणारे यांनी याकडे लक्ष देण्याची गरज. परळी शहरातील सर्वात मोठी असलेली स्मशानभूमी म्हणून शांतिवन स्मशानभूमी सर्वांना माहित आहे. एक काम उघडे केले की दुसरे काम समोर येते. दलित नगरपालिकेने फक्त बिले काढण्यासाठी आहे का? तोच दुसरी घटना लगेच समोर येते. रात्री आठच्या सुमारास शांतीवन स्मशानभूमी येथे एका युवकाच्या अंत्यविधी प्रसंगी उपस्थित असलेल्या प्रत्येकाला याचा प्रत्यय आला. स्मशानभूमी मध्ये रस्त्यावरचे सर्वच पथदिवे बंद, सोलार पथ दिवे, ते फक्त शोभेची वस्तू झाली आहे. तसेच भीमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर मधील अनेक भागात व मुख्य चौकातही हीच अवस्था आहे. जुने



हाय मास व पददिवे बंद पडले आहेत. फक्त आणि फक्त मेंटेनन्स अभावी बंद पडले आहेत. तात्काळ बंद पडलेले सर्व पथदिवे, हाय मासट चालू करा अशी मागणी या भागातील नागरिका कडून होत आहे.

# सासू-सुनेच्या हस्ते 'आई तुझं लेकरू' पुस्तकाचे प्रकाशन

आष्टी / प्रतिनिधी

कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या सौ.बेबीबानो आणि थोरली सून डॉ.मेहवश गौसिया या 'सासू-सुनेच्या' हस्ते कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या 'आई तुझं लेकरू' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले.'आई तुझं लेकरू' या पुस्तकाला सन २००७ सालचा महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट मराठी साहित्य निर्मिती राज्य पुरस्कार प्राप्त झालेला आहे.'आई तुझं लेकरू' आणि 'आई माझी नातवांची आजी' या 'आई' या विषयावरील दोन पुस्तकांना बाल साहित्याचा राज्य पुरस्कार मिळवणारे कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन हे बहुदा एकमेव साहित्यिक ठरतील.त्याच बरोबर



'सासू-सुनेच्या' हस्ते पुस्तक प्रकाशन,मराठी साहित्य इतिहासात अनोखा आणि आगळावेगळा सोहळा ठरेल.या प्रकाशन सोहळ्याचे साक्षीदार म्हणून चिरंजीव डॉ.सय्यद डेंटल क्लिनिकचे डॉ.सय्यद हुमायुद्दीन हे उपस्थित होते.

# समस्यांनी घेरलेल्या परळी शहराला शिस्त लावा

## परळी शहर भाजपाचे पोलिसांना निवेदन,महिलांच्या सुरक्षेकडे लक्ष द्या-सौ.उमाताई समशेट्टे

परळी / विकास वाघमारे
( दै. महाभारत )

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे क्षेत्र असलेल्या परळी शहराला अनेक समस्यांनी घेरले आहे.शहरातील वाहतूक, सीसीटीव्ही,रस्त्यावरील अस्ताव्यस्त गर्दीला शिस्त लावावी यासाठी परळी शहर भाजपाच्या शिष्टमंडळाने परळी शहर पोलिसांना निवेदन दिले.पोलिसांनी परळी शहरातील रस्त्यावर गस्त वाढवुन सुरक्षेकडे लक्ष द्यावे अशी मागणी भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांनी केली.

परळी शहर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणुन ओळख आहे.यामुळे उड्डाणपुल-आर्य समाज मंदिर-टॉवर-जिजामाता उद्यान-नेहरु चौक-पोलिस स्टेशन-वैद्यनाथ मंदिर मार्गावरील गर्दीवर नियंत्रण ठेवून रस्ता मोकळा करावा. अनेक प्रांतामधून प्रवासी बसेस येथे येतात. मंदिराकडे जाणारा हा रस्ता रेल्वे स्टेशन, बस स्थानकाशी जोडलेला आहे.येणारे दर्शन प्रवासी बसेस याच रस्त्याने येतात. आणि वाहनाची आणि या परिसरात जमाव करुन उभे राहणाऱ्यांची मिळून तेथे गर्दी होते. त्यामुळे हा आर्य समाज ते पोलिस स्टेशन रस्ता नेहमीच गर्दी होणारा असतो. यामुळे भाविकांची विशेषतः महिलांची खुप मोठी अडचण होते. रस्त्यावर चालणंही अवघड होतं.जमाव स्वरुपात गर्दी होऊन वाहतुक ठप्प होत असते. परळी शहरातील या वाहतूक समस्येला कारणीभुत असलेल्या राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात ट्रॅफिक पोलिस कायमस्वरूपी



नियुक्त करावा.प्रमुख चौकात बसवलेले सी.सी.टीव्ही. कॅमेरे कार्यान्वित करुन प्रत्येक चौकात ट्रॅफिक पोलीसांची नियुक्ती करण्यात यावी.छ.शिवाजी महाराज चौकात वाहतुकीवर नियंत्रण नसल्यामुळे कठड्याला धडक बसून तोडफोड झालेली आहे. अशा घटनेकडे पोलीस प्रशासनाने लक्ष द्यावे व भरधाव वेगाने जाणाऱ्या गाड्यांवर नियंत्रण घालावे, वैद्यनाथ मंदिराकडे जाणारी जड वाहणे ही बस स्टँड समोरुन,शिवाजी चौक ते मौलाना आझाद चौक मार्गाने वळविण्यात यावीत या मागणीसाठी मंगळवार दि.१७ जुन रोजी भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टी, राजेंद्र ओझा,महादेव इटके, नगरसेवक पवन मुंडे, नितीन समशेट्टी, सचिन गीते, मोहन जोशी, प्रशांत कराड,अनिश अग्रवाल, अश्विन मोगरकर,प्रितेश तोतला, राजेश कोलवार, विकास हलगे, सुशील हरंगुळे, रमेश गायकवाड, दिलीप नेहरकर,श्रीपाद शिंदे, अच्युत जोगदंड सर,किरण धोंड, विजय बुंदुले, उत्तम पवार,योगेश मुंडे,सुभाष कांबळे,विराज गीते, वैजनाथ आलदे,महिला आघाडीच्या श्रीमती सुचिता पोखरकर,डॉक्टर विना पारगावकर,चंदाताई ठोंबरे, अंजलीताई माळी,वर्षा जोशी, सारिका कुरील,चित्राताई देशपांडे, रोशनी नाथांनी,शोभा कुलकर्णी, महादेवी ममदापूरे आदींनी निवेदन दिले.

## अनुदानित आश्रमशाळा सामोडे येथील

# दहावी बारावी प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पुष्प देऊन सन्मान

सामोडे / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

आदिवासी विकास प्रकल्प धुळे प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशाने अनुदानित आश्रमशाळा सामोडे येथील दहावी व बारावीच्या प्रथम ,द्वितीय तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा.अनुदानीत आश्रमशाळा सामोडे यांच्या वतीने.विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष घरी जाऊन विद्यार्थी व पालक यांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यात साबरबर्डी येथील १२ वी विज्ञान ची शारदा राजू कामडे , तसेच ज्योती लक्ष्मण बागुल इयत्ता १२ वी कला,साबरबर्डी येथीलच इयत्ता १२ वी कला विभागातील ज्ञानेश्वर काळू महाले व सुनील काळू महाले यांचा व पालकांचा सन्मान करण्यात आला. नवापाडा येथील मनीषा प्रकाश भोये १२ वी विज्ञान शाखेत ६४ टक्के गुण



मिळवून उत्तीर्ण झाले, वाकी येथील इयत्ता १२ वी कला शाखेतील जयश्री सुरेश चौधरी या विद्यार्थ्यांनीने वडिलांचे दुःखद निधन काही महिन्यांपूर्वी झाले असतांना कला शाखेत ७१ टक्के गुण मिळवून यश संपादन केले.अशा सर्व विद्यार्थ्यांचा धुळे प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील व अनुदानित आश्रमशाळा सामोडे येथील मुख्याध्यापक तथा प्राचार्य मनेष माळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.राजेंद्र सोनवणे व इतर शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांचा व पालकांचा सन्मान करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

बीड / जिमाका

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करावे असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १८ जुलै २०२५, ही आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैदकीय, व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सरासरी ६०% किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी गुण प्राप्त झाले असतील, अशा उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीना महामंडळ कडून जेष्ठता व जास्त गुण क्रमांकानुसार विद्यार्थ्यास उपलब्ध निधीच्या अधीन राहुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यामुळे दि. १८ जुलै २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संपूर्ण कागदपत्रासह मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनीने जिल्हा कार्यालयाला संपर्क करावा. उशिरा आलेल्या कागदपत्र अर्जाचा जिल्हा कार्यालयामार्फत स्विकार करण्यात येणार नाही, असे कळविण्यात आले आहे.

पुढीलप्रमाणे मुळ कागदपत्रे दोन प्रतीसहित आणावीत.

मार्कशीट अर्थात गुण प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, जातीचा दाखला, उत्पनाचा दाखला, आधारकार्ड, दोन फोटो, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकेटसह व जिल्हा व्यवस्थापकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज कागदपत्रासह कार्यालयात आणून दाखल करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे-सरपते यांनी केले आहे.जिल्हा कार्यालयाचा पत्ताः- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), बीड डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन शासकिय विश्रामगृह समोर बीड फोन - ०२४४२-२२४९१६


# वाशिंद परिसराला पावसाने झोडपले, स्थानकात पाणीच पाणी

## 'जागोजागी'ठिंबक सिचंन,प्रवाशांचे हाल?

कल्याण / संजय कांबळे
(दै.महाभारत)

आज सकाळपासूनच टिटवाळा, खडवली, वाशिंद, आसनगाव, कसारा परिसराला पावसाने झोडपून काढले, मध्यरेल्वे वरील वांशिद रेल्वे स्थानकात सर्वत्र पाणीच पाणी झाले होते, जागोजागी ठिंबक सिंचन सुरू होते. तर तिकिटं घराच्या समोरच पादचारी पुलाचे पत्रे निघाल्याने पावसाची धारच येथे कोसळत होती, या सर्वांचा प्रवाशांना, तसेच ये जा करणाऱ्या ना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

कल्याण कसारा दरम्यान१२रेल्वे स्थानके तर कर्जत कल्याण मध्ये १०स्थानके आहेत, अमृत भारत स्थानक योजनेतंर्गत देशभरातील १हजार३०९स्थानकाचा पुनर्विकास करण्यात येत आहे. यामध्ये राज्यातील१०३स्थानकांची निवड करण्यात आली आहे.परंतु यातील आंबिवली, खडवली, वांशिद, आसनगाव, व त्यापुढील स्थानकांची बिकट अवस्था झाली आहे. अशातच आज वाशिंद परिसराला पावसाने झोडपून काढले, संपूर्ण वाशिंद स्थानकावर पाणीच पाणी झाले होते, पादचारी पुलावर तिकिट



घराच्या समोर पत्रा फुटल्याने पावसाच्या पाण्याच्या धारा डायरेक्ट पुलावर कोसळत होत्या, यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना छत्र्या उघडून पुलावरून जावे लागत होते.

पाय-यावर गटाराप्रमाणे पाणी वाहत होते, प्लँटफार्म वर बसायला सोडा उभे राह्याला कोरडी जागा शिल्लक नव्हती, याचा त्रास प्रवासी व नागरिकांना होत होता. कल्याण कसारा या रेल्वे मार्गावर सुमारे३०हजारच्या आसपास प्रवासी प्रवास करतात, यांना या त्रासाला सामोरं जावं लागत आहे.

# शाळेच्या सुट्ट्या संपल्या- आता शाळा सुरू

## रुई विद्यालयात मोफत सायकल, शैक्षणिक साहित्य,गणवेश,पाठ्य पुस्तकांचे वाटप

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची घोडागाडी बग्गीतुन नाचत गाजत मिरवणूक

निफाड ।रामभाऊ आवारे
( दै. महाभारत )

न्यू इंग्लिश स्कूल रुई, ता. निफाड जि. नाशिक येथे नवीन विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात बाजारतळ येथून संबळ या पारंपारिक वादनाने झाली. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांची मिरवणूक घोडागाडी बग्गीतून नाचत वाजत - गाजत काढण्यात आली. नविन विद्यार्थ्यांचे औक्षण करून,गुलाब पुष्प देऊन विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी विद्यालयाच्या प्रांगणात मोफत सायकल,शैक्षणिक साहित्य,गणवेश,पाठ्यपुस्तक वाटपाचा कार्यक्रम ह. भ. प.ज्ञानेश्वर माऊली शिंदे (साधना आश्रम रुई) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे, जनरल बॉडी सदस्य डॉ. सुजितजी गुंजाळ व उत्तर विभाग स्थानिक सल्लागार समिती सदस्य श्री.त्रंबक आबाजी चव्हाणके, रुई - धानोरे ग्रुप ग्रामपंचायतचे उपसरपंच श्री.अंकुश तासकर हे होते. सायकल, शैक्षणिक साहित्य, दप्तर हे रुई गावातील दानशूर लोकांच्या तसेच सल्लागार समिती अध्यक्ष,सर्व सदस्य तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या वर्गणीतून घेण्यात आले. या वस्तूंचे वाटप व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या हस्ते नवीन प्रवेशित तसेच गरजू विद्यार्थ्यांना करण्यात आले. याप्रसंगी प्रास्ताविकात विद्यालयाचे मा.मुख्याध्यापक यांनी प्रवेशित सर्व नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. चांगली गुणवत्ता देण्याचे पालकांना आश्वासित केले. त्यानंतर



रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ.श्री सुजितजी गुंजाळ यांनी शाळेत राबविण्यात आलेले विविध उपक्रम, शाळेतील एकूण गुणवत्ता, पटसंख्या या बाबतीत सर्वांचे कौतुक केले.तसेच नवीन तंत्रज्ञान असलेले कृत्रिम बुद्धिमत्तेचे शिबिर गावातील नागरिकांसाठी,पालकांसाठी आयोजित करण्याची सूचना मा.मुख्याध्यापकांना केली. याप्रसंगी स्थानिक सल्लागार समिती अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर दौलत तासकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.आपल्या अध्यक्षीय मनोगतात ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली शिंदे यांनी सुरू केलेल्या निवासी गुरुकुल आश्रमा बद्दल माहिती दिली, तसेच विद्यालयास तसेच निवासी गुरुकुल आश्रमास मदत करणाऱ्या लोकांचे कौतुक केले. कार्यक्रमास जानकीदास रघुवीरदास बैरागी समाधी ट्रस्ट,स्थानिक स्कूल कमिटी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती,शालेय सल्लागार समिती, पालक शिक्षक संघ, विशाखा समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष,सर्व सदस्य तसेच रुई,धानोरे,कोळगाव, माळचारी, शेखवस्ती येथील पालक शिक्षण प्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री चौरे ए.डी.यांनी केले.

# लेहा जहांगीर येथे नववीचा वर्ग सुरु करण्याची मागणी

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दैनिक महाभारत)

फुलंब्री तालुक्यातील मौजे लेहा जहांगीर या गावात जिल्हा परिषदेची इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत वर्ग असुन त्यानंतर च्या शिक्षणासाठी मुलांना पाल किंवा बोधेगाव या ठिकाणी सुमारे पाच ते सहा किलोमीटर पायपीट करावी लागते.खराब रस्ते,वाहतुकीची सोय उपलब्ध नसल्याने व इतक्या दूर मुलींना एकट्यांना पाठवणे पालकांना गैरसोयीचे व धोकादायक वाटत असल्याने बरेचसे पालक आठवी झाली की मुलींना घरी ठेवून घेतात परिणामी मुलींचे शैक्षणिक नुकसान होते आहे म्हणून मौजे लेहा जहांगीर येथील शालेय व्यवस्थापन समितीच्या शिष्टमंडळाने आमदार सौ.अनुराधा ताई चव्हाण यांची



भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले व लवकरात लवकर जिल्हा परिषद अंतर्गत नववीचा वर्ग सुरू करण्याची विनंती केली.

यावेळी भाजपा सोशल मीडिया तालुकाध्यक्ष समाधान पाटील नवले,ग्रामपंचायत सदस्य आन्ना मैंद,ज्ञानेश्वर निकम,सुधाकर पवार,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भागिनाथ बनकर,उपाध्यक्ष मारोती म्हस्के,सदस्य अरुण निकम,संतोष पवार,कैलास रसाळ सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# आदर्श प्राथमिक व ग्रामगीता माध्यमिक शाळेत आज जल्लोषात प्रवेशोत्सव

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दै.महाभारत)

तालुक्यातील मतेवाडी फाटा पिंपळगाव वळण येथे मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन पेन्सिल व ढोलताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले शहरी भागांतील प्राथमिक माध्यमिक शाळा सरकारच्या निर्देशानुसार सोमवार (१६ जून) सुरू झाल्या आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी शाळा प्रवेशाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे.

फुलंब्री तालुक्यातील पिंपळगाच वळण, मतेवाडी येथील आदर्श प्राथमिक विद्यालय व ग्रामगीता माध्यमिक विद्यालयातील विद्याथ्र्याचे पुष्पवर्षाव करून स्वागत केले. या वेळी ढोल वाजवून टाळ्यांच्या गजरात पुष्पगुच्छ आणि गुलाबाचे फूल देऊन आदर्श प्राथमिक शाळेचा मुख्याधापिका अश्विनी जाधव व ग्रामगीता माध्यमिक शाळेचे सचिव,तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक योगेश जाधव यांनी स्वागत केले. शाळेचा शिक्षकांनी शाळा प्रवेशद्वारावर मुलांचे औक्षण करून स्वागत केले. तसेच पहिल्याच दिवशी विद्यार्थांना पुस्तके व नवीन शैक्षणिक साहित्याचे वाटप शाळेचे अध्यक्ष तथा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश उपसचिव काशिनाथ जाधव, संचालिका लताबाई जाधव, सचिव तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक योगेश जाधव यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी शाळेतील सहशिक्षक सचिन



निर्मळ,अनिल गायकवाड, अन्सार शेख, वैशाली तायडे, पुष्पा काकडे, सविता लाडगे, परसराम घुगे, संदीप निधोनकर, निता गायकवाड,जिवन पवार, भाऊसाहेब शिरसाठ,आकाश म्हस्के, आदीसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नळदुर्ग पालिकेवर गाढव मोर्चा

तुळजापूर/अजित चव्हाण
(दै. महाभारत)

नळदुर्ग:- बोरी धरण भरलेले असताना, नळदुर्ग शहराला मात्र पंधरा दिवसांतुन एकदा पाणी मिळत आहे. प्रशासनाच्या या अजब कारभाराला कंटाळलेल्या संतप्त नळदुर्गकरांनी थेट नगर परिषदेवर 'गाढव मोर्चा' काढून आपला रोष व्यक्त केला. ऐतिहासिक किल्ला गेट येथून गाढव मोर्चास सुरुवात करण्यात आली. मोर्चात सहभागी नागरीकांनी हातात फलक घेत प्रशासनाचा निषेध केला. गाढवाच्या गळ्यात मुख्याधिकारी नावाचा फलक अडकवून, सुस्त प्रशासनाची धिंड काढली जात होती. क्रांती चौक, चावडी चौक, बसवेश्वर चौक, जय भवानी चौक, शास्त्री चौक मार्गे नगर परिषदेवर धडकलेल्या या मोर्चात नागरिकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष शहबाज काझी, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते अजहर जहागीरदार, मुन्ना शेख, व्यापारी



मंडळाचे अध्यक्ष सतीश पुदाले, मुकुंद नाईक,(उबाठा) सरदारसिंग ठाकूर, शहर प्रमुख संतोष पुदाले, मनसेचे ज्योतीबा येडगे, प्रमोद कुलकर्णी, लहुजी शक्ती सेनेचे शिवाजी गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

पाणीपुरवठा, स्वच्छता आणि दिवाबत्ती या मूलभूत सुविधा न मिळाल्यास नगर पालिकेला कुलूप ठोकून राष्ट्रीय महामार्गावर 'रास्ता रोको' आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. नळदुर्ग पोलिसांनी आंदोलनादरम्यान चोख बंदोबस्त ठेवला होता.

# नफरवाडीतील चिमुकले शाळेत आले बळीराजाच्या रथातून जावे आनंदाच्या गावा ख दयावा आनंद आणि आनंदचि घ्यावा।।

प्रा.एस खंडागळे /पाटोदा
(दै.महाभारत)

तालुक्यातील नफरवाडी गावच्या आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्वागत बळीराजाच्या रथातून करण्यात आले.... सकाळी सकाळी झाडावर पाखरांची पिलं आणि रस्त्यावर शाळेची मुलं किलबीलताना पाहुन ४५ दिवस मनाला सुट्टीमुळे आलेली मरगळ क्षणार्धात चैतन्यात रुपांतरीत झाली ...कारण होते ... प्रवेशोत्सव व शाळापूर्वतयारी मेळावा...!!! दि १६/६/२५ रोजी शाळेत ई १ लीत प्रवेशित होणाऱ्या चिमुकल्यांची बैलगाडीतून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणूकीमध्ये, गावचे सरपंच,उपसरपंच,ग्रा.प.सदस् , शा.व्य.समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष सर्व सदस्य, शिक्षणप्रेमी नागरीक, शाळेचे माजी विद्यार्थी, तरुण वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीचे स्वागत गावचे सरपंच यांनी तोफा वाजून उत्स्फूर्तपणे केले. मिरवणुकीनंतर शाळेत नवगतांचे स्वागत गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन करण्यात आले. तदनंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तके वाटप आणि गणवेश वाटप करण्यात आले . एरवी शाळेचे नाव काढताच आईच्या पदराआड दडणारं छकुलं आज मात्र विजयी सैनिका सारख डौलात नव्या सवंगड्यांच्या ताफ्यात सहभागी होत होतं . पहिल्याच दिवशी १०० % प्रवेश झाले. अशा प्रकारे प्रवेशोत्सव मोठया थाटामाटात साजरा केला .. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शा.व्य. समितीचे उपाध्यक्ष अशोक वाघ तर प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या सरपंच विद्याताई बंडू सवासे, अध्यक्ष उत्तरेश्वर औटे,माजी अध्यक्ष भारत ढेरे, शा.व्य.समितीचे सदस्य तथा शिक्षणप्रेमी सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय सावंत सर,माजी सरपंच बंडू सवासे, शा.व्य. समिती सदस्य बाळू ढोले, रविकांत वणवे,दगडू मंडलिक,अशोक मंडलिक,अतिष तांबे,परमेश्वर औटे,भारत तळेकर,लक्ष्मण कवडे,ईश्वर तांबे,नानासाहेब तांबे,विष्णू ढेरे,इत्यादी होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन श्री.मुरूमकर



सर यांनी, प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री खंडागळे सर यांनी तर आभारप्रदर्शन श्री.राऊत सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.खंडागळे सर,मुरूमकर सर,राऊत सर,काकडे मॅडम,वावरे मॅडम तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

प्रा.शा.नफरवाडी शाळेमध्ये आता बालक कधीही रडत_ रडत शाळेत येणार नाही कारण त्यांना पहिल्याच दिवशी आनंद संस्कार करून शाळेत आणले आहे .जि.प.प्रा.शा.नफरवाडी शाळेची पटसंख्या वाढ होत आहे. पाटोदा तालुक्याच्या ठिकाणावरून ग्रामीण भागात असणाऱ्या नफरवाडी शाळेत विद्यार्थी प्रवेशित होत आहेत ही बाब आमच्यासाठी अभिमानास्पद आहे.

अण्णासाहेब खंडागळे
मुख्याध्यापक
जि.प.प्रा.शा.नफरवाडी



# इनरव्हील क्लब तर्फे इचलकरंजी बस स्थानक येथे हिरकणी कक्षाची उभारणी

इचलकरंजी / संभाजी गुरव
( दैनिक महाभारत )

इनरव्हील क्लब तर्फे इचलकरंजी बस लस्थानक येथे स्तनपान कक्षाचे सुशोभीकरण केले. त्याचे उद्घाटन इनरव्हील अध्यक्षा सौ. चंदा कोठारींच्या सासूबाई आदरणीय नीलाजी कोठारी, पीडीसी बिना बगाडिया, पीडीसी वैशाली लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्तनपान कक्षाला इनरव्हील क्लब तर्फे सुसज्ज पलंग, गादी, मच्छरदाणी सहित पाळणा, बेबी खुर्ची, कचरा बादली देण्यात आले. तसेच भिंतीवर प्रेरणादायक, आकर्षक स्लोगन चित्रीकरणाने सुशोभित करून दिले. स्तनपान कक्ष खूपच आल्हाददायक व सुंदर झाला आहे. सर्वांनी अवश्य भेट द्यावी. या कार्यक्रमाला अध्यक्षा सौ. चंदा कोठारी, सेक्रेटरी प्रेमलता सारडा, एडिटर विभा जैन, माजी अध्यक्षा सुनिता डालमिया, अनिता जैन, मीनाक्षी तंगडी, प्रेमा मर्दा, शिला रांदड, राखी बांगड व मेंबर उपस्थित होते.

तसेच आगार व्यवस्थापक शिल्पा थोरात उपस्थित होते. स्तनपान करणाऱ्या आईला आरामदायक वाटावे, प्रवास करता यावे तसेच गरज वाटल्यास विश्रांती घेता यावी, बाळांस झोप मिळावी या उद्देशाने या कक्षाचे सर्वसामान्य जनतेला फायदा होईल. त्यासाठी एसटी महामंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांचे खूप खूप. धन्यवाद.

# विटनेर जि.प. शाळेत मुख्याधिकारी राहुल पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत.

## शालेय साहित्य वाटप




चोपडा / महेश शिरसाठ
(दै.महाभारत)

आज दिनांक १६ जून २०२५ रोजी जि.प. उच्च प्राथमिक शाळा विटनेर येथे इयत्ता पहिली दाखल पात्र नवोगतांचे स्वागत व शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम चोपडा न.प.चे मुख्याधिकारी श्री राहुल पाटील, विटनेर गावाचे सरपंच ,उपसरपंच सदस्यगण, तसेच सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष व सदस्य पालकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा झाला.

कार्यक्रमावेळी शालेय गणवेश, बूट, सॉक्स,लेखन साहित्य व मोफत पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. नवोगतांचे स्वागत करण्यात आले. स्वत: मुख्याधिकारी हे प्रभातफेरीत सहभागी झाले होते. माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम आकर्षणाचा मुद्दा ठरला. मुख्याधिकारी श्री राहूल पाटील यांनी पहिलीच्या विद्यार्थ्यांशी हितगुज केले व त्यांचा उत्साह वाढवला. शाळेचे मुख्याध्यापक श्री भास्कर धनगर सरांनी शाळेच्या गेल्या वर्षभरातील विकास व गावातील सहकार्याबद्दल माहिती सादर केली.

कार्यक्रमावेळी श्री हेमंत पाटील सरांनी सूत्रसंचालन केले शाळेची योशोगाथा सांगितली श्री.नामदेव अहिरे सरांनी . विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्य दिले. शाळेतील शिक्षिका श्रीमती सुनिता श्रीराम गावळ यांनी रांगोळी काढून शालेय परिसर सुशोभित केला तसेच शिक्षण प्रेमी नागरिक व गावकरी या सर्वांच्या सहकार्यामुळे व मुख्याध्यापकांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. शेवटी मुख्याधिकारी राहुल पाटील यांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले व सर्व शिक्षक वृंदांचे कौतुक केले.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य, ध्येय व चांगल्या सवयी आत्मसात कराव्यात-पत्रकार किशन भदर्गे

माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

शहरातील नावारूपाला आलेली व प्रतीथ यश राजस्थानी माध्यमिक व प्राथमिक शाळेमध्ये आज दिनांक १६ जून २०२५ रोजी शाळेचा पहिला दिवस असल्याने इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे व विद्यार्थिनींचे पुष्पगुच्छ व खेळणी पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले व आनंदाच्या व हरषोउल्लासाच्या वातावरणात शाळेचा पहिला दिवस सुरू झाला याप्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष व सायं दैनिक अभिमानाचे माजलगाव तालुका प्रतिनिधी किशन भदर्गे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य ध्येय निश्चिती व चांगल्या सवयी आत्मसात करून पुढील आयुष्यामध्ये चांगली शिक्षण घेऊन स्वतःचा सर्वांनी विकास करून घ्यावा या कार्यक्रमाचे अध्यक्ष व माहेश्वरी शिक्षण



प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री ओमप्रकाश मानधने संस्थेचे सचिव व ज्येष्ठ संपादक श्री रामानंदजी लड्डा, राजस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.तौर सर प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तौर मॅडम तसेच पालकांचे प्रतिनिधी लांडगे आप्पा यांप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व त्यांना पुष्प देऊन त्यांचं सहर्ष स्वागत करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. तौर मॅडम यांनी केली

# इचलकरंजीचा. शिवतीर्थ परिसर नॉन व्हेज गाडे मुक्त

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै.महाभारत)

इचलकरंजी शहरातील शिवतीर्थ च्या आजू बाजूला असणाऱ्या नॉनव्हेज गाड्यांचे स्थलांतर बाबत नगर पथ विक्रेता समिती मध्ये निर्णय घेण्यात आला होता त्यानुसार कोल्हापूर जिल्हा छोटे व्यापारी, फेरीवाले संघटना अध्यक्ष व पथ विक्रेता समिती सदस्य दिपक पाटील यांनी पुढाकार घेऊन येथील सर्व नॉनव्हेज विक्रेत्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून या सर्वांचे स्थलांतर इतरत्र केल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

शहारात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढले आहे. याच्या अनुषंगाने शहरातील सर्व चिकन ६५, बिर्याणी, तंदुरी या नॉन व्हेज चे गाडे बंद करण्याचे आदेश महापालिका आयुक्त पल्लवी पाटील यांनी दिले होते. परंतु सर्वांचे हातावरचे पोट असल्यामुळे आणि याच गाड्यावर सर्व कुटुंबाचा उदरनिर्वाह असल्यामुळे महापालिका आयुक्त पल्लवी पाटील यांना संघटनेच्या वतीने वारंवार विनंती करण्यात आली.परंतु सर्वानाच शिस्त लावणे देखील गरजेचे आहे. त्यामुळे विक्रेत्यांचा उदरनिर्वाह चालावा व नागरिकांना त्रास होऊ नये या दृष्टिकोनातून नगर पथ विक्रेता समिती च्या बैठकीमध्ये नॉनव्हेज विक्रेत्यांसाठी स्वतंत्र हॉकर्स झोन निर्माण करण्याचे ठरविण्यात आले आहे. यानुसार सर्वप्रथम शहरातील शिवतीर्थ २ चे काम लवकरच सुरु होणार असल्यामुळे या शिवतीर्थ च्या १०० मीटरच्या आत असणाऱ्या सर्व बिर्याणी, चिकन ६५ व तंदुरी विक्रेत्यांना इतरत्र हलवण्यासाठी कोल्हापूर जिल्हा छोटे व्यापारी, फेरीवाले संघटना अध्यक्ष व पथ विक्रेता समिती सदस्य दिपक पाटील यांनी पुढाकार घेऊन सर्व विक्रेत्यांची बैठक घेतली व इचलकरंजी महापालिका आयुक्त पल्लवी पाटील, अतिक्रमण विभाग प्रमुख सुभाष आवळे यांच्या सहकार्याने सर्व विक्रेत्याना रजिस्टर ऑफिस समोरील पार्किंग जवळ जागा उपलब्ध करून दिली आहे.

या ठिकाणचा सर्व परिसर विक्रेत्यांनी स्वच्छ करून स्वखर्चाने ४ एल.ई.डी. लाईट ची व्यवस्था केली असून या ठिकाणी नॉन व्हेज खाऊ गल्ली तयार केली आहे. शिवतीर्थ परिसरातील सर्वच १० विक्रेत्यांनी आपला व्यवसाय सुरु केला आहे. त्यामुळे शिवतीर्थ परिसर हा नॉन व्हेज हात गाडा मुक्त करण्यात यश आले आहे.यासाठी मा. आमदार सुरेशराव हाळवणकर, भाजपा इचलकरंजी शहराध्यक्ष पै. अमृत मामा भोसले यांचे मार्गदर्शन लाभले असून, इचलकरंजी शहराध्यक्ष सतीश नायडू, पथ विक्रेता समिती सदस्य सौ. अश्विनी कुबडगे, सौ. लक्ष्मी कांबळे, श्रीमती सुवर्णा कुसाळे, समीर सोलापुरे, मनीष नायडू, राकेश माळी, श्रीनिवास फलपाटी, श्रीमती वेणूताई पोवार, तसेच मिलिंद माने, महंमद देसाई, अरुण शेंडे, सुनील पाटील, सिद्धार्थ कांबळे, श्रावण सावंत यांच्यासह विक्रेते उपस्थित होते.

# राजिप खांदाड शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात उत्साहात

## गुणवता पूर्ण शिक्षण कसे देता येईल या साठी शिक्षकांनी प्रयत्न करावे - तहसीलदार दशरथ काळे

बोरघर / माणगाव
( विश्वास गायकवाड )

शैक्षणिक वर्ष २०२५- २६ ची सुरुवात सोमवार दि १६ जून २०२५ रोजी माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा खांदाड मध्ये मोठ्या उत्साहाने व आनंददायी वातावरणामध्ये झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माणगाव तहसीलदार दशरथ काळे उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्यामार्फत शाळा प्रवेशोत्सव २०२५- २६ च्या आदेशानुसार शाळेमध्ये इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा पावसाच्या साथीने व लेझीम , ढोल वाजवत साजरा करण्यात आला. पहिली मध्ये प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांची शाळेच्या प्रांगणात आल्यावर औक्षण करून , कोऱ्या पानावर मुलांच्या पायाचे ठसे घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माणगाव तसिलदार दशरथ काळे उपस्थित होते. तसेच या वेळी खांदाड गाव चे अध्यक्ष काशीराम पवार , उपाध्यक्ष अनंत पवार शाळा कमिटीचे अध्यक्ष महेश पवार , उपाध्यक्ष तेजस्वी घर्वे , केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, गावचे पोलीस पाटील नथुराम पवार, खजिनदार रामदास पवार , संतोष मांजरे , सचिन मांजरे, दत्ताराम पवार ,संजय मालोर, संजय माने , स्वीकृत नगरसेवक मनोज पवार , मारुती मालोरे, पारखे , संतोष मोरे , राशिद कासार , समीर गुगले , सुहास शिंदे, विठोबा पालकर , राहुल दसवते, राजेंद्र पवार , अंगणवाडी सेविका भोनकर मदतनीस आदी मान्यवर उपस्थित होते. सुरवातीला विद्येची आराध्य देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . यावेळी उपस्थित मान्यवरांच्याहस्ते फित कापून प्रवेशोत्सव सोहळ्याचे उदघाटन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका नंदिनी वाले व सहाशिक्षिका मधुरा वेदपाठक यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या मुलांचे पहिले पाऊल कुंकवाच्या साहाय्याने संस्मरणीय करण्यात आले. मुलांना पेन्सिल, वही, अंकलिपी, व खाऊ इत्यादी साहित्य देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी विध्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या वेळी आपल्या अध्यक्षीय मनोगतात तहसीलदार काळे यांनी बोलताना सांगितले सध्या पालकांचे इंग्रजी माध्यमांकडे जास्त कल असून विद्यार्थ्यांची मराठी शाळांकडे पाठ फिरताना दिसत आहे. याला कारणीभूत आपण पालक आहोत यावर्षी सीबीएससी पॅटर्न प्रमाणे इयत्ता




पहिली सुरू होत आहे पुढच्या वर्षी दुसरी सुरू होईल असे आता मराठी शाळा देखील इंग्रजी माध्यमांप्रमाणे होणार आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना नक्कीच शिक्षण चांगले मिळेल ही जबाबदारी शाळेतील शिक्षकांच्या असून गुणवत्तापूर्ण शिक्षण कसा देता येईल यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजेत. माणगाव केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी आपल्या मनोगतात खांदाड शाळेच्या राज्यस्तरावरील सादरीकरणाबद्दल कौतुक करून शाळेला शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी उपस्थितांचे आभार

# औंढा नागनाथ येथे सहकुटुंब येऊन नियोजित अभिषेक

जालना/प्रतिनिधी (दै.महाभारत)

दिनांक १५ जून २०२५ रोजी एकता परिषद महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अभिमन्यू उबाळे मामा यांनी औंढा नागनाथ येथे सहकुटुंब येऊन नियोजित अभिषेक केला.. शासकीय विश्रामगृह येथे एकता परिषदेच्या कार्यकारणी आणि माळी समाजाची विविध पदाधिकारी विविध माळी संघटना कर्मचारी, डॉक्टर, शिक्षक नगरसेवक आणि व्यावसायिक सर्वांच्या भेटी घेऊन अरण येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज तीर्थक्षेत्र विकासासंबंधी माहिती दिली. तसेच मा. अतुल सावे, कॅबिनेट मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली एकता परिषदेचा पूर्ण महाराष्ट्रामध्ये विस्तार करणार असे त्यांनी सांगितले.तसेच पुणे येथील भिडे वाडा संदर्भात माहिती दिली.अभिमन्यू उबाळे यांच्यासोबत एकता परिषद कार्यकारणी सदस्य महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय आढाव ,महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश सारंग, संभाजीनगर अध्यक्ष मारुती शिंदे, एकता परिषद कार्यकारणी सदस्य जवळे उपस्थित होते, यासाठी नगरसेविका कुंताबाई गोबाडे, नगरसेवक तथा सावता सेनेचे तालुकाध्यक्ष आणि बाजार समितीचे संचालक साहेबराव देशमुख, समाजसेवक नंदू पाटील , संदीप गोबा डेसावता परिषदेचे युवा जिल्हाध्यक्ष तथा राष्ट्रवादी ओबीसी चे अध्यक्ष विकी देशमुख ,एकता परिषद हिंगोली अध्यक्ष अमोल गोबाडे ,परभणी एकता परिषद अध्यक्ष तथा परभणी ओबीसीसी बीजेपीचे अध्यक्ष रोहित राऊत, नगरसेविका सुनीता ताई जावळे, महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव स्वातीताई वाखरकर , डॉक्टर नागेश उदगीरे ,राज्य सहकारी बँकेचे उप मॅनेजर सुशील लुटे, एडवोकेट सौरभ जावळे, कल्पवृक्ष अकॅडमी चे संचालक अमोल मांडे .प्रदीप गोबाडे सतीश सोनुने .शुभम लुटे .आकाश राठोड हे बैठकीस उपस्थित होते.





जालना/प्रतिनिधी (दै.महाभारत)
बंजारा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना मुंबईत भेटून निवेदन देतांना राष्ट्रीय बंजारा परिषदेचे जालना जिल्हाध्यक्ष राजेश पवार. मराठवाडा युवा अध्यक्ष राजाराम पवार.

# मोदी सरकारची यशोगाथा नव्या भारताची

## ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बेलापूर विधानसभा क्षेत्रात आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या माध्यमातून विकसित भारत संकल्प सभा संपन्न

नवी मुंबई / संतोष वाव्हळ
(दै.महाभारत)

सन - २०१४, २०१९, नंतर २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाले आणि भारताचे लोकोप्रीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजी यांनी ९ जून २०२४ रोजी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. अर्थात जून महिन्यात मोदी सरकारला ११ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याच अनुषंगाने भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई जिल्हा व बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या माध्यमातून विकसित भारताचा अमृतकाळ सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दिनांक १५ जून २०२५ रोजी सीबीडी येथील वारकरी भवन येथे विकसित भारत संकल्प सभेचे दीपप्रज्वलन भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, हावरे प्रॉपर्टीज व्यवस्थापकीय संचालक, तथा माजी राज्यमंत्री, शिर्डी साईबाबा ट्रस्टचे अध्यक्ष माननीय सुरेशजी हावरे साहेब व विश्व मांगल्य ट्रस्टच्या उपाध्यक्षा सौ. नलिनी हावरे यांच्या शुभहस्ते झाले.

तसेच त्या पुढे म्हणाल्या की, श्रीनगरचे उपराज्यपाल माननीय मनोजजी सिन्हा यांनी श्री अमरनाथ जी श्राइन बोर्ड (एसएएसबी) ची पुनर्रचना करून विविध क्षेत्रातील नऊ प्रतिष्ठित व्यक्तींना तीन वर्षांसाठी सदस्य म्हणून नामांकित केले आहे. त्यामध्ये नवी मुंबईचे भाजपा ज्येष्ठ नेते तथा हावरे प्रॉपर्टीजचे व्यवस्थापकीय संचालक, तथा माजी राज्यमंत्री, शिर्डी साईबाबा ट्रस्टचे अध्यक्ष माननीय सुरेशजी हावरे साहेब यांची सदस्य म्हणून नेमणूक झाल्याबद्दल सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांचा हि जाहीर सत्कार करण्यात आला व त्यांची पत्नी विश्व मांगल्य ट्रस्टच्या उपाध्यक्षा सौ. नलिनी हावरे यांचा हि सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर विविध योजनेअंतर्गत लाभार्थी व वकील, डॉक्टर, इंजिनीअर तसेच विविध पदांवर असलेल्या लाभार्थ्यांचा सत्कार माननीय सुरेशजी हावरे साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले.




तसेच आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या प्रत्येक योजनेमध्ये जनकल्याण, सामान्य माणसाचे जीवन सुखकर करण्यासाठीच्या योजना तसेच देशाला जागतिक स्तरावर नवी ओळख देण्याच्या हेतू आहे. गेल्या ११ वर्षात मोदी सरकारने देशाच्या सीमा मजबूत केल्या, अर्थव्यवस्था मजबूत केली. तसेच तंत्रज्ञानाला सामान्य माणसापर्यंत पोहचविले. त्याच बरोबर ऑपरेशन सिंदूर कडून भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केले. पाकिस्तानचा हवाई तळ हि उध्वस्त केला. हिंसाचाराला, दहशतवादाला घरात घुसून उत्तर दिले जाईल हेच मोदी सरकारने दाखवून दिले. त्याच बरोबर पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेमधून ८१ कोटीहून हि अधिक लोकांना मोफत ध्यान्याचा पुरवठा केला, तासेच्ज ६८ लाखापेक्षा अधिक फेरीवाल्यांना स्वनिधी योजनेअंतर्गत कर्ज पुरवठा केला. मुद्रा योजनेतून ५२.५ कोटी पेक्षा अधिक छोटया व्यावसायीकांना कर्ज पुरवठा करण्यात आला. देशातील १११ जल मार्गांना राष्ट्रीय जलमार्ग म्हणून मान्यता देण्यात आली. त्याच बरोबर ९० लाख स्वयंसहाय्यता गटांची १० कोटीहून अधिक महिला जोडल्या गेल्या. स्वच्छ भारत अभियानात १२ कोटी पेक्षा अधिक शौचालये बांधण्यात आली. तसेच अयोध्येत श्री रामचंद्रांच्या भव्य मंदिराची निर्मिती अनेक वर्षाचे स्वप्न साकार केले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदिजी यांच्या ११ वर्षाच्या कार्यकाळात विविध योजनेअंतर्गत अनेक लाभार्थ्यांनी योजनानांचा लाभ घेतला. त्याच बरोबर महाराष्ट्रात देखील लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात नागरिकांना विविध योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात लाभ मिळत आहे.यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी महापौर अनिल कौशिक, माजी नगरसेवक तथा बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक दीपक पवार, माजी परिवहन समिती सदस्य तथा माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, माजी नगरसेविका अनिता शेट्टी, भाजपा ज्येष्ठ नेते नाथा सरगर, भाजपा ज्येष्ठ कार्यकर्ता गोपाळराव गायकवाड, पंजाब कल्चरल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष कमळ शर्मा, हरियाणा वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष बलबीरसिंग चौधरी, भारतीय सहकार संस्था अध्यक्ष प्रमोद जोशी, वाशी भाजपा मंडळ अध्यक्ष विकास सोरटे तसेच भारतीय जनता पार्टी, नवी मुंबई जिल्ह्याचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी, नागरिक व लाभार्थी



## क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून ४५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै.महाभारत)

येथील क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून डॉ.राम भालचंद्र माध्यमिक विद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी शालेय साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले.शहरालगत असलेल्या परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणाऱ्या डॉ.राम भालचंद्र माध्यमिक विद्यालयात क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून शालेय साहित्य व गणवेश वाटपाचा कार्यक्रम सोमवार, दिनांक १६ जुन २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सुनिल आवाड तर प्रमुख अतिथी म्हणून नारायणराव हारेगांवकर (अध्यक्ष, कोष्टी समाज संघटना, अंबाजोगाई.), क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव राम वसंतराव घोडके, युवक नाभिक महासंघ शाखा अंबाजोगाईचे अध्यक्ष बालाजी वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते कमलाकर (अंकुश) हेडे, सामाजिक कार्यकर्ते अंकुशराव घोडके, अमोल राऊत या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नारायणराव हारेगांवकर, बालाजी वाघमारे यांनी समायोचित मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप सुनिल आवाड यांनी केला. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे सचिव राम घोडके म्हणाले की, शालेय गणवेश आणि शैक्षणिक साहित्य वाटप हा विद्यार्थ्यांसाठी एक महत्वाचा कार्यक्रम आहे. अनेक शाळा आणि सामाजिक संस्था विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांना शिक्षणामध्ये समान संधी मिळावी यासाठी हे वाटप करतात. शालेय गणवेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक समानता आणि आपलेपणाची भावना येते. शिक्षण विभागातर्फे पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश योजना राबविली जाते. असे असले तरी बांधिलकी म्हणून काही शाळांमध्ये क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या सारख्या सामाजिक संस्थांच्या मदतीने गरजू विद्यार्थ्यांना गणवेश दिले जातात. गणवेशामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते अधिक उत्साहाने शाळेत येतात. शालेय साहित्यामध्ये वह्या, पुस्तके, कंपास पेटी, पेन्सिल, आणि इतर शैक्षणिक साहित्य यांचा समावेश असतो. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत होते आणि त्यांची शैक्षणिक प्रगती चांगली होते. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या पालकांवरील आर्थिक भार कमी होतो. गणवेश आणि शैक्षणिक साहित्य वाटप केल्याने विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवता येतात. यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये चांगली संधी मिळते आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होते असे सचिव घोडके यांनी सांगितले. सुत्रसंचालन मनोज शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार खमरोद्दीन शेख यांनी मानले. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी क्रांतिज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या सर्व पदाधिकारी पदाधिकारी व सदस्य यांनी पुढाकार घेतला.

# कोल्हापूर जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी तंबाखू सेवन आढळल्यास दंड

## २३ जून रोजी विशेष मोहीम : जिल्हाधिकारी अमोल येडगे

कोल्हापूर / प्रकाश कांबरे
(दै. महाभारत)

कोल्हापूर : तंबाखू सेवनास आळा घालण्यासाठी जिल्ह्यात २३ जून रोजी विशेष मोहीम राबवून, सार्वजनिक ठिकाणी, यात सर्व शाळा-महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये संबंधित आस्थापनांचे प्रमुख तपासणी करून दंडात्मक कारवाई करतील. या विशेष मोहिमेबाबत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम समन्वय समितीच्या बैठकीत निर्देश दिले. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शाहूजी सभागृहात संपन्न झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षातील डॉ.विक्रम आरळेकर जिल्हा सल्लागार, चारुशीला कणसे मानसशास्त्रज्ञ, क्रांती शिंदे सामाजिक कार्यकर्ता, प्रियांका लिंगडे कार्यक्रम सहाय्यक यांच्यासह आरोग्य विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.



आता प्रत्येक शासकीय कार्यालयातील प्रमुख अधिकारी किंवा कर्मचारी, जे आस्थापनाविषयक कामकाज पाहतात, ते तंबाखू नियंत्रणाचे कामकाज पाहतील. त्यांना या मोहिमेत 'दंड अधिकारी' म्हणून ओळखले जाईल. कार्यालयात तसेच कार्यालयात येणाऱ्या बाहेरील व्यक्तीकडून तंबाखू सेवन आढळल्यास दंड अधिकारी संबंधितावर कारवाई करेल आणि दंड आकारेल. यासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयात यापूर्वी दंड पावती पुस्तिकांचे वितरण केले आहे. सर्वसामान्य नागरिक शासकीय कार्यालयात तंबाखू सेवन करताना आढळल्यास दोनशे रुपये दंड, तर शासकीय कर्मचारी किंवा अधिकारी आढळल्यास दुप्पट दंडासह प्रशासकीय कारवाई केली जाईल. तसेच, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्येही दंडाच्या पावती पुस्तिकांचे वितरण केले जाणार आहे. शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांना या दंडात्मक कारवाईबाबत उद्दिष्ट नेमून दिले जाणार आहे. याबाबत २३ जून रोजी संपूर्ण जिल्ह्यात विशेष मोहीम राबवून, सर्व शाळा, शासकीय कार्यालये आणि महाविद्यालयांमध्ये संबंधित आस्थापनांचे प्रमुख आणि दंड अधिकारी यांनी तपासणी करून दंडात्मक कारवाई करणार आहेत.

गावपातळीवर आशा ताईंचा तंबाखूविरोधी मोहिमेत सहभाग वाढवून, त्यांना गावातील किमान एक पुरुष किंवा स्त्री तंबाखूमुक्त करण्याचे उद्दिष्ट द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. शासकीय कार्यालय स्तरावर तंबाखूमुक्त कार्यालय मोहीम राबविली जाणार आहे. कार्यालयात तंबाखूचे सेवन आढळल्यास अशा व्यक्तींना समुपदेशन करावे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी अभियानातून जनजागृती करावी. शालेय परिसरात तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन किंवा विक्रीस प्रतिबंध नियमांची यशस्वी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केल्या.

कोल्हापूर जिल्ह्यात तंबाखूमुक्ती समुपदेशन केंद्र १४ असून, त्याठिकाणी नोंदणी केलेल्या रुग्णांची संख्या एप्रिल ते मे २०२५ या काळात ११०८ इतकी आहे. त्यापैकी एकूण १५७ जणांनी तंबाखू सेवन सोडले आहे. यासंदर्भात कॅन्सरग्रस्त संशयितांची संख्या १०९असून, त्यापैकी ३ जण कॅन्सरग्रस्त आढळले आहेत.

## शुभमंगल करायचंय ? एजंट, दलालांपासून सावध राहा!

# विवाहाच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार वाढले ; पोलिसांचा इशारा

निफाड ।रामभाऊ आवारे
( दै. महाभारत )

लग्न हे केवळ दोन व्यक्तींमधील नव्हे, तर दोन कुटुंबांमधील पवित्र बंधन असते. मात्र अलीकडच्या काळात या नात्याच्या नाजूक भावनांचा गैरफायदा घेत, विवाहाच्या नावाखाली आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. विशेषतः ऑनलाईन विवाह संस्थांपासून ते स्थानिक एजंट, दलाल, भोंदू बाबा आणि काही तथाकथित विवाह मंडळांच्या माध्यमातून वधूपित्यांची लूट सुरू आहे.'उत्कृष्ट स्थळ आहे', 'लगेच जुळवणी करू शकतो' अशा आमिषांना भुलून पालक लाखो रुपये देतात. काही वेळा प्रत्यक्ष स्थळ दाखवून 'संपर्कात आहोत', 'लग्न जुळलंच आहे' असे सांगितले जाते. मात्र एकदा पैसे घेतल्यावर संबंधित एजंट किंवा दलालांचे फोन बंद होतात.यामुळे फसवले गेलेले पालक अखेर पोलिस किंवा न्यायालयाचा दरवाजा ठोठावतात.

तालुक्यातील काही गावांमध्ये अशा घटनांचे प्रमाण वाढले असून, विशेषतः वय ओलांडलेली मुले-मुली, प्रेमविवाह करू इच्छिणारी जोडपी, तसेच शहरात राहणाऱ्या पण ग्रामीण पार्श्वभूमीच्या कुटुंबांना लक्ष्य केले जात आहे. बनावट वेबसाइट्स, फसवी 'मैत्री संस्था', खोटे लग्नमेळावे यांच्या माध्यमातून हजारोंची फसवणूक होत आहे. मात्र इज्जत वाचावी म्हणून पालक पोलिस तक्रार करण्यास धजावत नाहीत.

फसवणुकीचे सामान्य प्रकार

बनावट विवाह मंडळांमार्फत स्थळ दाखवून पैसे घेणे, वेबसाईट किंवा सोशल मीडियावर बनावट प्रोफाइल तयार करून विश्वास संपादन करणे, 'लग्न जुळवतो' म्हणून थेट भेटी आणि भेटवस्तूंच्या नावाने पैसे घेणे, संपर्क झाल्यानंतर अचानक मोबाईल नंबर बंद करणे.



सावध राहा, फसवणूक टाळा!

विश्वासू व स्थानिक ओळखीच्या लोकांमार्फतच स्थळ जुळवा, कुठल्याही आर्थिक व्यवहारापूर्वी संबंधित व्यक्तीची पार्श्वभूमी तपासा, पोलिसांकडून नोंदणी, विवाह मंडळाचे परवाने आणि त्यांची अधिकृतता पडताळा, कोणतीही शंका असल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधा.

अनोळखी मध्यस्थ, एजंट किंवा संस्थांवर विश्वास ठेवण्याआधी सतर्क रहा. विवाह नोंदणीची प्रक्रिया अधिकृतपणे पार पाडा. कोणतीही ओळख वा दस्तऐवज न तपासता कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नका.भास्करराव शिंदे सहायक पोलीस निरीक्षक लासलगाव

# 'रेशन'वरील तांदूळ,गहु,धान्याचा किनवट नजीकच्या गावात खुल्या बाजारात विक्री..

माहूर (दै.महाभारत)

पुरवठा विभागातील खाबुगिरीमुळे माहूर तालुक्यातील गोरगरिबाच्या अन्नावर कल्ला मारून धान्य दर महिन्याला किनवट नजीकच्या गावात धान्य काळ्या बाजारात जात आहे. रेशनच्या गव्हापासून रोटी आणि तांदळापासून इडली तयार व कुरकुरे करण्यासाठी मोठी मागणी आहे. गोरगरिबाच्या अन्नावर डल्ला मारणारे तांदूळ माफिया गोळा करणारी एजंट माहूर तालुका व ग्रामीण भागात सक्रिय झाले आहे. यातून धान्य व्यापारी गब्बर होत आहेत. याची कारवाई होऊ नये, म्हणून साहेबां' नाही काळ्या बाजारातून कमावलेली कमाई हप्ता म्हणून पोहोच करणारे रॉकेट आहे. यातून काही बड्या व्यापाऱ्याकडून पटाईत असलेल्या एजंटाला धरून व मॅनेज करून सगळ्यांना खिशात घालत आहे.

रेशनच्या धान्याचा काळाबाजार मागील अनेक वर्षापासून चालू आहे. हा काळाबाजार करण्याची पद्धत तांदूळ गहू तस्करांनी बदलली आहे. छोटया व्यापाऱ्यांना म** विकत घ्यायला लावून नंतर तोच गहू व तांदूळ विकत घेतल्याचे दाखवून नवीन पोत्यामध्ये भरून विक्री करण्याचा धंदा चालवायला सुरू केला आहे. या माहूर तालुक्यात गाव खेड्यात तांदूळ व्यापारी गोरगरीब लाभार्थ्यांकडून १८ ते २० रुपये किलो प्रमाणे घेण्यात येते आणि तोच माल काही मोठ्या व्यापाऱ्यांना ठोक भावात विकल्या जातो.




रेशन दुकानावर गरजूंना स्वस्त दरात दिले जाणारे धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी नेले जातय आहे. त्यासाठी एक मोठी साखळी अस्तित्वात असूनही साखळी तोडण्याचा काम पुरवठा विभागाकडे आहे मात्र अपुरे मनुष्यबळ आणि काळा बाजारा मधील विक्री करणाऱ्या चोळीचे मोठे साम्राज्य यामुळे खऱ्या लाभार्थ्यापर्यंत जाणारे धान्य हे इतर ठिकाणी विकले जात आहे.

# नवोदित बाल गोपाळ विद्यार्थ्यांचे वाकद जि प शाळेत मिरवणूकीने स्वागत

## विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्य पुस्तकांचे ही वाटप

निफाड ।रामभाऊ आवारे
( दै. महाभारत )

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकद (शिरवाडे) तालुका निफाड या ठिकाणी नवगतांचे जल्लोषात स्वागत, मोफत गणवेश व पाठ्य पुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे १६ जुन रोजी शाळेची घंटा वाजली आणि इयत्ता पहिलीचे विद्यार्थी आयुष्यात पहिल्यांदाच शाळेकडे आले.शाळेत दाखल झालेल्या इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची वाजत गाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली. त्यांचे मिठाई व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शाळेतील त्यांचा प्रवेश अविस्मरणीय व्हावा यासाठी शिक्षणाचे माझे पहिले पाऊलहा उपक्रम राबविण्यात आला.त्यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश गायकवाड,अनिता भवर, राहुल बडवर ,सुनील बडवर ,सोमनाथ बागुल, शाहनवाज सय्यद,भाऊसाहेब भवर,राजेंद्र भवर, अशोक वाळुंज,माया बच्छाव, सोमनाथ गाडेकर,प्रतिभा शिंदे,ज्योती सोनवणे,मंगल निकम,रूपाली दिघे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल बोडके यांनी केले व मुख्याध्यापक बाबासाहेब आवारे यांनी सर्वांचे आभार मानले.जयश्री लोहार सोमनाथ चोरे व ज्योती पालवे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




# लिलाताई ज्ञानोबा उजगरे यांचा अमृतमहोत्सव संपन्न

माजलगाव : अमर साळवे
( दै. महाभारत )

उजगरे नाना आणि लिलाताई उजगरे हे दांपत्य भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून दीर्घ काळ धम्म कार्यात झोकून दिले होते नानांच्या निधनानंतरही ताईंनी न थांबता धम्म चळवळीचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले, आणि समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.उजगरेताई यांनी भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षिका व विविध पदावर काम करुन धम्म चळवळ गतीमान करण्याचे कार्य सातत्यान केले सद्या त्या भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व च्या 'जिल्हा संस्कार उपाध्यक्षा' म्हणून कार्यरत आहेत.त्यांची निष्ठा, समर्पण आणि आंबेडकरी विचारांप्रती असलेली अढळ आस्था ही नव्या पिढीसाठी मार्गदर्शक आहे.

त्याचा ७५ वा अमृतमोहत्सव सौभाग्य मंगल कार्यालय केसापुरी कॅम्प येथे साजरा करण्यात आला कार्यक्रमाची शुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पुजन लिलाताई उजगरे, चंद्रशेखर उजगरे,अमोल उजगरे ,व मुली जावई यांच्या हस्ते करुन धम्म वंदनेने करण्यात आली त्या नंतर भारतीय बौद्ध महासभा,सदधम्म सेवा संघ, यशोधरा बुद्ध विहार व अनेक उपस्तीत धम्म उपासकांकडुन गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन बहुजन विकास मोर्चा चे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे हे होते या कार्यक्रमासाठी पुज्य भन्ते पय्यातीस महाथेरो यांची उपस्तीती होती या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे, एस बी मोरे,शामभाऊ वाघमारे, डॉ भागवत साळवे, के व्ही साळवे,कचरुतात्या खळगे, अंकुश आण्णा,जाधव,श्रीहरीनाना मोरे,अविनाश तात्या जावळे,,पांडुरंग जाधव,जि एन घनघाव, बाबासाहेब जाधव मंदाताई साळवे,हरिबाई टाकणखार, शोभाताई भोजने,सह सामाजीक, धार्मीक,राजकिय क्षेत्रातील मान्यवर यांची उपस्तीती होती या ठिकाणी ज्ञानलिला या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले




# आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती ,नगरपालिका निवडणुकीसाठी गावा गावात कामाला लागा

# आ.प्रा.चंद्रकांत सोनवणेंचे कार्यकर्त्यांना फर्मान

चोपडा / महेश शिरसाठ
(दै.महाभारत)

येथील बोथरा मंगल कार्यालयात आगामी जिल्हा परिषद ,पंचायत समिती , नगरपालिका निवडणुका व संघटनात्मक बांधणी ,सदस्य नोंदणी करणे संदर्भात चोपडा व यावल तालुका शिवसेना पक्षाची महत्वाची बैठक आमदार प्रा चंद्रकांत अण्णा सोनवणे व माजी आमदार सौ लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

यावेळी आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी कार्यकर्त्यांना पुढे येऊ घातलेल्या निवडणूका व शिवसेना पक्ष संघटनात्मक सदस्य नोंदणी विषयी मार्गदर्शन केले.यावेळी माजी आमदार सौ. लताताई सोनवणे, नरेंद्र पाटील सभापती कृ.उ.बा चोपडा, बबलु कोळी उप सभापती कृ.उ.बा यावल, मुन्ना पाटील माजी सभापती कृ.बा.यावल, सुभाष आप्पा साळुंखे माजी जिल्हा परिषद सदस्य ,माणिक बापु महाजन माजी उप.सभापती प.स, प्रताप अण्णा पाटील, प्रकाश दादा रजाळे, भबुत आण्णा चौधरी ,रावसाहेब पाटील संचालक ,गोपाल पाटील संचालक, अँडो.शिवराज पाटील संचालक, सुर्यभान पाटील यावल कृ.उ.बा संचालक ,विजय पाटील संचालक ,किरण देवराज संचालक, सौ कल्पनाताई पाटील संचालक, सौ मंगलाताई पाटील, हरिष पाटील मा.जि प सदस्य, एम व्ही पाटील माजी उप सभापती प स ,नामदेव पाटील ,विकास पाटील ,माजी उपनगराध्यक्ष, राजेंद्र पाटील माजी शिवसेना तालुकाप्रमुख, किशोर चौधरी माजी उपनगराध्यक्ष ,मेहमुद बागवान माजी उपनगराध्यक्ष ,हनीफ सत्तार, प्रकाश दादा राजपूत माजी नगरसेवक, संध्याताई महाजन माजी नगरसेविका, महेंद्र धनगर मा नगरसेवक ,सौ अनिता ताई शिरसाठ ,सौ भावना ताई महाजन ,सौ भारती महाजन, सौ शितल देवराज ,दिपक चौधरी ,गोपाल चौधरी राजेंद्र पाटील सर, भरत चौधरी सर ,किरण पाटील सागर ओतारी, कैलास बाविस्कर , सुनिल बरडिया,प्रविण देशमुख,विपीन जैन,निवृत्ती पाटील, प्रविण जैन,रमजान तडवी,धिरज गुजराथी,नंदू गवळी ,दिव्यांक सावंत,गोलु मराठे, महेंद्र पाटील,भरत साळुखे व तालुका भरातील पदाधिकारी व कार्यकर्ते हे उपस्थित होते.



# पुरोगामी वृत्तपत्र विक्रेता संघटनेची वार्षिक सर्वसाधरण सभा खेळीमिळीत संपन्न

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै.महाभारत)

येथील पुरोगामी वृत्तपत्र विक्रेता संघटनेची वार्षिंक सर्वसाधरण सभा समाजवादी प्रबोधिनीच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली सभेच्या अध्यक्षस्थानी शिवगोंडा खोत होते यावेळी बोलताना खोत म्हणाले पुरोगामी वृत्तपत्र विक्रेता संघटना ही विक्रेत्याच्या एकजुटीवर उभी असून आज संघटना प्रत्येक निर्णय हा विक्रेत्याच्या भविष्याचा विचार करुन घेत असून यामधूनच आपण येणार्या अडचणीवर मात करित पुढे जात आहोत यापुढे देखील वृत्तपत्र विक्रेत्यांच्या आयुष्यात कायम स्वरूपी स्थिरता यावी यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेले वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ लवकर कार्यान्वीत व्हावे यासाठी आपण पुढाकार घेणार असून लवकरच या संदर्भात पश्चिम महाराष्ट्रा मधील सर्व तालुका पदाधिकारी यांची बैठक घेणार आहे असे सांगितले . यावेळी सचिव अण्णा गुंडे यांनी संघटनेच्या विक्रेत्यांच्या विविध सुचनाचे निरसन करून भविष्यात संघटनेची आर्थीक स्थिती कशी मजबूत केली जाईल यांची माहिती दिली.यावेळी संघटनेला सहकार्य केल्याबद्दल बलराम भोजणे,मिलिंद वेदपाठक,मनोज खेतमर व अतुल मुंसडी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे खजिनदार नारायण शिंदे यांनी नोटिस व विषयांचे वाचन केले व सर्व विषय एकमताने मंजूर करुन घेतले.श्रध्दांजलीचे वाचन सुरेश चौगुले यांनी केले तर अभिनंदनाचा ठराव कृष्णा हजारे यांनी मांडला सुत्रसंचलन शिवानंद रावळ यांनी केले तर स्वागत महेश बावळे यानी केले शेवटी आभार अमर मुंसडी यांनी मानले सभेला मोठ्या प्रमाणात वृत्तपत्र विक्रेते बंधू उपस्थीत होते.




# ढेबेवाडी तालुका पाटण येथे पारंपारिक वाद्याच्या गजरात पाचवीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव थाटामाटात साजरा

पाटण / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

ढेबेवाडी तालुका पाटण येथील राजश्री छत्रपती शाहू महाराज विद्यालय २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव पाचवी विद्यार्थ्यांचा ढोल ताशाच्या गजरात साजरा करण्यात आला. इयत्ता पाचवी च्या विद्यार्थ्यांची पारंपारिक वाद्यांच्या गजरात बाजारतळ येथून बस स्थानकापर्यंत व बस स्थानकाहून शाळेपर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणूकीत मान्सूनचा झिमझिम पाऊस व पेरणीचा हंगाम सुरु असताना देखील उत्साहाने सामील झालेले महिला, पुरुष पालक, प्रतिष्ठित नागरिक, समस्त ग्रामस्थ मंडळी, विद्यार्थ्यांचे ठिकठिकाणी औक्षण करणाऱ्या माता भगिनी या सर्व दिमाखदार सोहळ्यासह मिरवणूक डामडौलात शाळेच्या प्रवेशद्वारावर दाखल झाली.

फुलांचा वर्षाव करत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. अतिशय सुंदर असं देखणं स्वप्न अमरसिंह पाटणकर दादांच्या माध्यमातून या ठिकाणी उभ केले जात आहे या शाळेमध्ये अतिशय चांगल्या प्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात आहे या विद्यालयातून डॉक्टर इंजिनीयर व्यावसायिक अशा प्रकारचे विद्यार्थी घडले पाहिजेत ज्ञानाचा प्रकाश घरोघरी पोहोचला पाहिजे यासाठी येथील सर्व शिक्षक अहोरात्र प्रयत्न करत आहेत आपण सुद्धा पालक म्हणून आपली जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे असे प्रतिपादन अभिजीत कडव (उपसरपंच ढेबेवाडी) यांनी केले.

या कार्यक्रमामध्ये इयत्ता १० मधील प्रथम पाच क्रमांक, इयत्ता ८ वी छ.च.च.ड पात्र जिल्ह्यामध्ये ४ था क्रमांक मिळवणाऱ्या कु. राधाकुमारी रावत आणि सारथी शिष्यवृत्ती मध्ये ६ विद्यार्थी पात्र तसेच इयत्ता ७ वी मधील मंथन परीक्षेमध्ये मिळालेले यश, आणि इयत्ता ५ वी मधील स्कॉलरशिप परीक्षामध्ये २ विद्यार्थी पात्र झाल्याबद्दल गुणवंत यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

मंद्रुळकोळे गावातील सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवाजी जाधव यांनी नवीन येणाऱ्या मुलांना वह्याचे वाटप केले, विद्यालयाच्या सेवानिवृत्त जेष्ठ शिक्षिका सौ. विद्या पाटील(मॅडम) यांनी मुलांना पेन आणि खाऊ वाटप केले, इयत्ता ८वी मधील छ.च.च.ड पात्र मुलांना प्रेरणा देण्यासाठी दानशूर व्यक्तीमत्त्व श्री. महेश माने यांनी प्रत्येकी ६ विद्यार्थ्यांना ५०० रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून दिले, यानंतर इयत्ता १० वी मधील प्रथम ५ क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव बक्षीस भेटवस्तू देऊन करण्यात आला, इयत्ता ७ वी मधील मंथन परीक्षेमध्ये मिळवलेले यश आणि इयत्ता ५ वी मधील स्कॉलरशिप परीक्षा मध्ये २ पात्र झालेले विद्यार्थी यांचा सन्मान शालेय उपयोगी भेटवस्तू देऊन करण्यात आला, सर्व नवीन येणाऱ्या मुलांचा सत्कार पुष्पगुच्छ, वही, पेन, खाऊवाटप, पाठ्यपुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. राजेश गायकवाड यांनी केले, ढेबेवाडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. दादा कडव यांनी बहुमूल्य असे विचार आपल्या मनोगनात व्यक्त केले, विद्यालयाच्या सेवानिवत्त शिक्षिका सौ. पाटील मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमाचे अध्यक्ष मालदन गावचे समाजसेवक श्री. दीपक इंगवले यांनी आपल्या आढावात शाळेचा आलेख मांडला, या कार्यक्रमास सौ. ढेबेवाडी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. रुपाली पाटील, उपसरपंच श्री. दादा कडव,ग्रा. पं. सदस्य सोमनाथ पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. बळवंत पाटील, श्री. दीपक इंगवले, श्री. शिवाजी जाधव,दिपू नाना, अण्णा कारंडे, महेश माने, जमीर डांगे, नारायण सुतार, समीर डांगे, शंकर पाटील, सदा सुतार, बंडा घोरपडे, ज्ञानदेव काळुगडे, चंद्रकांत पाटील, श्री.मोहन ढेब, श्री.अनिल सपकाळ भाऊ,तसेच कार्यक्रमासाठी सर्व पालक ग्रामस्थ उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.झेंडे मॅडम यांनी केले, कार्यक्रमाचे आभार श्री.विक्रम पाटील सर यांनी मानले.



# फुलवळ जिल्हा परीषद मध्ये प्रवेश घेणाऱ्या पालकांची नळ पटी व घरपटी माफ.!

कंधार । धोंडीबा मुंडे
( दै. महाभारत )

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील ग्राम पंचायतीने जिल्हा परीषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या पालकाचे एक वर्षाची घरपट्टी व पाणीपटी माफ करण्याच निर्णय शाळेच्या पहील्या दिवशी विद्यार्थीचे व पालकाचे स्वागत व पुष्पगुच्छ देऊन सत्कार प्रसंगी सरपंच सौ.विमलबाई मंगनाळे यांनी जाहीर केल्या ही फुलवळ सर्कल मधील पहिली ग्रा.प.आहे,जि.प.शाळेत प्रवेश घेणाऱ्या पालकांची पाणी पटी व घरपटी माफ करनारी या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष मंगेश पांचाळ हे होते,तर उदघाटक सरपंच विमलबाई मंगनाळे ह्या होत्या प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करुन पहिलीत प्रवेश घेणाऱ्या पाल्याचे व पालकाचे शाळेच्या वतीने केंद्रप्रमुख कुटे,मु.अ.कामण मंगनाळे,सहशिक्षीका हांडे,गवळे,व पुरानिक व काब्दे यांनी शाळेतील पाल्याचे व पालकांचे स्वागत करून पहील्याच दिवसी सर्व विद्यार्थीना पाठ्य पुस्तकाचे वाटप उपस्थीत असलेल्या प्रमुख पाहुणे सरपंच प्रतिनीधी नागनाथ मंगनाळे,ग्रामपंचायत अधिकारी बालाजी भायगावे,बालाजी बोरगावे,रब्बानी शेख,दिंगबर डांगे,विश्वभर बसवंते,संजय डांगे,प्रदिप बसवंते अदीच्या हस्ते वाटप करण्यात आले या सकुंलाचे केद्र प्रमुख कुट्टे सर यांनी उपस्थीत मान्यवराना शिवाजी कोण होता,व वसा दाभोळकराचा ही पुस्तके भेट देउन त्यांचा सत्कार केला. यावेळी केदार देवकांबळे,रहीम शेख,बालाजी देवकांबळे अदी उपस्थित होते.




# पावसाळ्यात महावितरण कर्मचाऱ्यांचा कष्टदायक प्रवास....!

कुडूत्री / सुभाष चौगले
(दै.महाभारत)

पावसाळ्यात वीज जरी थोडा वेळ गेली तरी घरी अंधार दाटतो. घरातील सर्व विजेची उपकरणे बंद राहतात ......मग मात्र मनाची घालमेल सुरू होते. कधी एकदाची लाईट येते.... जसा विचार आपल्याला पडतो तसा विचार वीज वितरण कर्मचारी यांना पडतो....... मग पाय मात्र घटनास्थळी आपसूकच वळले जातात, आणि सुरू होतो तो संघर्षमय आणि कष्टदायक प्रवास .... वारंवार घडणाऱ्या खंडीत वीज पुरवठ्यामुळे कर्मचाऱ्यांचे मन मात्र स्वस्थ बसू देत नाही.

पावसाळा सुरू झाला की, वादळ-वारा, मुसळधार पाऊस, यामुळे वीज तारा तुटून खाली पडतात आणि वीज पुरवठा खंडित होतो. तो पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण कर्मचाऱ्यांचे हात मात्र पुढे सरसावतात प्रसंगी पावसाळ्यातील काम करत असताना जीवावर उदार होऊनच काम करावे लागते. पावसाळ्यातील चार महिने मात्र कसे निघून जातात. याच विवंचनेत कर्मचारी असतात.



पावसाळा सुरू झाला की, वीज वारंवार खंडित होण्याचे प्रमाण वाढते रात्री अप - रात्री जंगलातून, काट्याकुट्यातून, चिखलातून,अन खाच-खळग्यातून मोठ्या महापुरातून घटनास्थळी जावे लागते. वीज खांबावर चढताना ओल्या पायांनी,चिखल पायाने चढावे लागते.पाय घसरून पडण्याची दाट शक्यता देखील असते पण कर्तव्यात कधी कसूर केली जात नाही.

पावसाळ्यातील पूरकाळात पाण्यातून जलचरांचा संघर्ष करत वीज पुरवठा सुरळीत करावी लागतो. हे सर्व करत असताना कामातील सचोटी प्रामाणिकपणे बजावलेले कर्तव्य हा महावितरण कर्मचाऱ्यांचा वाट्याला येणारा संघर्ष कष्टदायकच म्हणावा लागेल. आपण फक्त लाईट गेली म्हणून निराश होतो.पण कर्मचारी वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी जीवाच्या आकांताने धाव घेत असतात ...... आणि करावा लागतो तो मात्र संघर्षमय प्रवास...तोही धोक्याचा.